जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मंदिरात धार्मिक कार्यक्रमास विरोध करणाऱ्यांवर कारवाई न झाल्यास 'आमरण उपोषण' करणार

नगर - भिंगारच्या वैद्यनगर येथील सिद्धाविनायक मंदिरात धार्मिक कार्यक्रमास विरोध करणाऱ्यांवर कारवाई न झाल्यास 'आमरण उपोषण' करण्याचा इशारा माजी सैनिकांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, भिंगार येथील वैद्यनगर येथे १५ वर्षापासून सिध्दीविनायकाचे मंदिर आहे. मंदिरामध्ये विविध देवतांच्या मुर्ती आहेत. वैद्यनगर व परिसरातील नागरिक मंदिरात श्रध्देने येतात. गेल्या १४ वर्षापासून अखंड हरीनाम सप्ताह दरवर्षी आयोजन केले जाते. तसेच सर्व सण साजरे केले जातात. गणेशोत्सव व नवरात्रोत्सव भक्तीभावाने या ठिकाणी साजरे केले जात आहेत.

गैरतक्रारदार यांनी त्रिदल नावाने एक संघटना स्थापन केली व त्याच्या आधारे ते आम्हास विरोध करु लागले, आम्हास सिध्दीविनायक मंदिरामध्ये येण्यास मज्जाव करु लागले. वास्तविक पाहता मंदिर हे ओपन स्पेसमध्ये असून, ओपन स्पेसची जागा ग्रामपंचायत वडारवाडी, भिंगार यांच्या मालकीची आहे. या ठिकाणी सन २०१० साली लोक सहभागमधून आम्ही सिध्दीविनायक मंदिर बांधलेले असून, त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करुन वेगवेगळया देवाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा केलेली आहे. ग्रामपंचायतीचे नावावर असलेल्या ओपन स्पेसमध्ये आम्ही सार्वजनिक वर्गणी करुन मंदिराची उभारणी केलेली आहे. तसेच त्यामध्ये वेळोवेळी आम्ही स्वखर्चाने सुधारणा केलेल्या आहेत. तसेच सदर मंदिराशी आमच्या धार्मिक भावना जोडल्या गेलेल्या आहेत. आम्ही सदर सिध्दीविनायक मंदिराची जिवापाड देखभाल व काळजी घेत आहोत. परंतु गैरतक्रारदार हे बेकायदेशीरपणे आम्हास विरोध करुन सर्व धार्मिक प्रथा, रुढी परंपरा नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहेत. सदरचे गैरतक्रारदार हे अडदांडव व नंगट स्वभावाचे आहेत. त्यांना वेळोवेळी समजावून सांगून देखील ते विनाकारण आम्हास विरोध करत आहेत. केवळ दहशत निर्माण करण्यासाठी सदरचे गैरतक्रारदार हे आम्हास शिवीगाळ करुन धमकावित आहेत व मंदिराचे पावित्र्यास धक्का लावत आहेत. गैरतक्रारदार यांचेकडून सदर मंदिराची नासधुस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वैद्यनगर व परिसरातील भक्तांच्या धार्मिक भावना दुखावतील.


मंदिरात धार्मिक कार्यक्रमास विरोध करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निवेदन जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात देण्यात आले. (छाया - बबलू शेख)

तक्रार अर्जाची गांभीर्याने दखल घेऊन गैरतक्रारदार यांच्याविरुध्द अत्यंत कडक कायदेशीर कारवाई करावी व गैरतक्रारदार यांनी आमच्या, वैद्यनगर व परिसरातील सिध्दीविनायक मंदिराच्या भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या व धार्मिक कार्यक्रम करण्यास विरोध केला म्हणून गैरतक्रारदार यांच्याविरुद्ध योग्य त्या कलमान्वये गुन्हयाची नोंद व्हावी. गैरतक्रारदार यांनी आम्हास शिवीगाळ करुन धमकावित असल्यामुळे त्यांच्यापासून आम्हास संरक्षण मिळावे. आमचे अर्जानुसार गैरतक्रारदार यांच्याविरुध्द ७ दिवसांचे आत कारवाई न झाल्यास आम्ही आपले कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसू, असा इशारा वैद्यनगर येथील माजी सैनिकांनी दिला आहे. निवेदनावर ५३ नागरिकांच्या सह्या आहेत.

## प्रेरणादायी अक्षरधन...






### प्रेम करा तरुणांनो... प्रेम करा...

सामान्यतः जुनी पिढी नवीन, तरुण पिढीला हे करू नको, ते करू नको असे अडवतच असतात. एक तरुण वैतागून घर सोडण्याच्या तयारीत होता. त्याचे सुदैवाने योग्य समुपदेशन झाल्याने तो सावरला. त्यासाठी त्याच्या आईवडिलांशी बोलताना विचारले की तुमचा मुलगा वाया गेलाय, म्हणजे नक्की काय? काय करतो तो?

त्यांनी एकामागून एक तक्रारी केल्या. तो सिगरेट ओढतो, कॉलेज बंक करून पिक्चरला जातो, हॉटेलिंग करतो, दारू पितो, अभ्यास करतो पण एका मुलीबरोबर त्याची 'भानगड' आहे. फार गुंतलाय तिच्यात!

मी त्या वडिलांना हळूच विचारले, ''तुमची सध्या कुठल्या मुलीशी भानगड इ. चालू आहे का?''

त्यांनी खवळून सांगितले, ''वाटेल ते काय बोलता? असलं काही करायचं माझं वय आहे का?'' तेव्हा मी म्हटलं, ''हे जर कळतंय तर 'भानगडी'चं वय कोणतं हेही तुम्हाला समजत असेल.'' त्यांच्या लक्षात आलं.

मी म्हटलं, माफ करा, तुमचा अपमान करण्याचा हेतू नाही. पण तुमचा मुलगा त्या वयाला शोभेल असंच वागतोय. तुम्ही सांगितलेल्या सर्व गोष्टी त्या वयातल्या नैसर्गिक आहेत.

तरुण मित्रांनो, तारुण्यात काहीसं भरकटणं, स्वच्छंदी असणं स्वाभाविक तरी मूळ जागी परत येता येईल इतपतच भरकटलं पाहिजे. मेहनत, करीअर डोळे उघडे ठेवनून करतांना प्रेम करणं ही तारुण्याची 'मिरास'च आहे. सु.शि.नी सांगितलेल्या कवितेतील ओळी पाहा.

''प्रेम करा, तरुणांनो, तारुण्य पुन्हा येत नाही. योग्य वेळी प्रेम केलं तर म्हातारपण जळकं लाकूड होत नाही! प्रेम करा असं, जसं वारकऱ्यांचं वारीवर असतं, व्यापाऱ्यांचं धंद्यावर असतं नि कोडग्या राजकारण्याचं सत्ता नि खुर्चीवर असतं. - असं प्रेम करा की, प्रेमी युगलं तुमचं नाव घेतील. तुमच्या प्रेमाची प्रेमगीते नाही, लोकगीतं होतील...''

# सावेडी येथील सोनानगर चौकात गांजा बाळगणाऱ्या दोघांना पकडले

नगर - विक्री करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला, मनोव्यापाऱ्यावर परिणाम करणारा गांजा बाळगणाऱ्या दोघांना तोफखाना पोलिसांनी पकडले. या कारवाईत आठ किलो गांजासह चार चाकी वाहन असा ६ लाख २७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई सावेडी परिसरातील सोनानगर चौकातील विराम हॉटेल समोरील मोकळ्या जागेत १५ एप्रिल रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास केली.

तोफखाना पोलिसांना अशी माहिती मिळाली की सावेडी परिसरातील सोनानगर चौकातील विराम हॉटेलच्या समोरील मोकळ्या जागेत एक होंडा कंपनीच्या चारचाकी गाडीमध्ये दोन इसम गांजा विकण्याच्या उद्देशाने गांजा स्वतःच्या कब्जात बाळगून आहे अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलिसांनी तहसीलदार अ.नगर यांच्यासह तोफखाना पोलीस पथक मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गेले असता त्यांना विराम हॉटेलच्या समोरचा मोकळ्या जागेत एक चार चाकी गाडी (क्र. एम एच ०१ ए ई ७२१३) दिसली. पोलिसांनी गाडीला घेराव घालून आतील दोघांना खाली उतरण्यास सांगून त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव संदीप उर्फ संजय राजू मालुंजकर (वय २५) सचिन प्रताप कतारी (वय २६, दोघे रा. संजय गांधी नगर, गल्ली नं ८, संगमनेर) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी ज्यांच्या गाडीची झेडपी घेतली असता गाडीच्या डिक्कीत १ लाख २७ हजार ५०० रुपये किमतीचा, ८ किलो ५३५ ग्रॅम वजनाचा, हिरवट रंगाचा पाने व फुले अर्धवट ओला व सुका असलेला गांजा, मिळून आला. पोलिसांनी गांजासह पाच लाख रुपये किमतीची होंडा कंपनीची चार चाकी कार असा ६ लाख २७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन दोघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार योगेश चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुद्ध एन डी पी एस कायदा कलम ८ (क), २० (ब), २९ गुन्हा दाखल केला. पुढील कारवाई तोफखाना पोलीस करीत आहे.

# डॉ. आंबेडकर जयंती मिरवणुकीत डी जे दणाणला; ५ मंडळांवर गुन्हा

नगर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुकीमध्ये विनापरवाना डीजे सिस्टीम लावून कर्णकर्कश आवाजात गाणी लावून मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण करुन सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी क्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटी व नियमाचे उल्लंघन करणाऱ्या पाच मंडळाविरुद्ध कोतवाली पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई माणिक चौक, भिंगारवाला चौक, कापडबाजार येथील कोहिनूर कापड दुकानासमोर, शाहूनगर केडगाव येथे केली.

या कारवाईत सिद्धार्थ ग्रुप बालिकाश्रम रोड या मंडळाचे अध्यक्ष शुभम साहेबराव बडेकर (रा. सुडकेमळा, अ.नगर) डी जे चालक मालक विकास पंढरीनाथ माने (रा. बाबुर्डी घुमट, ता.नगर) मैत्री प्रतिष्ठान अ.नगर मंडळाचे अध्यक्ष आकाश लक्ष्मण शिंदे (रा.शांतीनगर, सारसनगर, अ.नगर) डीजे चालक मालक प्रसाद बाबासाहेब आंबेकर (रा.आंबेकरमळा, यमुनानगर, अ.नगर.), घटनापती मित्र मंडळ कॉटेज कॉर्नर, अ.नगर मंडळाचे अध्यक्ष पंकज रमेश दिवे (रा. प्लॉट नं. २५५/११, नागापूर पुलाजवळ, डॉन बॉस्को कॉलनी, सावेडी, अ.नगर) डी जे चालक मालक प्रशांत शिवप्पा सनदी (रा.भीमनगर, कमतपूर, हुकेरी, बेळगाव, कर्नाटक.) रवी कांबळे मित्र मंडळ केडगाव या मंडळाचे अध्यक्ष आदेश अशोक कांबळे (रा. देवी रोड केडगाव) डीजे चालक मालक अक्षय अविनाश उगलमुगले (रा. नेप्ती, ता. नगर), पंचशील प्रतिष्ठान केडगाव मंडळाचे अध्यक्ष मिलिंद राजकुमार कांबळे (रा. केडगाव, अ.नगर) व डीजे चालक-मालक लक्ष्मण शंकर माने (रा. धामोरी, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३, १५ व ध्वनी प्रदूषण अधिनियम २००० चे कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

पुढील कारवाई कोतवाली पोलीस करीत आहे.

# पुणे बसस्थानक येथून १८ वर्षीय तरुणी बेपत्ता

नगर - छत्रपती संभाजीनगर येथे जाण्याकरिता पुणे बसस्थानक येथून एसटी बसमध्ये बसवून दिलेली अठरा वर्षीय तरुणी कोठेतरी निघून गेली. तिचा फोनही बंद असल्याने तिचा तपास लागला नाही. तिच्या घरच्यांनी तिचा, नातेवाईक तसेच मैत्रिणीकडे व नगर शहरात शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. याप्रकरणी बेपत्ता मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद केली.

बेपत्ता तरुणीचे वर्णन असे रंग निमगोरा, उंची पाच फूट पाच इंच, शरीरबांधा मध्यम, नाक सरळ, चेहरा उभट, डोळे तरतरीत, पेहराव पिवळ्या रंगाचा टॉप, काळ्या रंगाची लेगिज, निळ्या रंगाचा स्टोल असे आहे.

# आया - बहिणींकडे वाकड्या नजरेने पहाल तर शिवसेना स्टाईल चोप देवू

**किरण काळे यांचा इशारा; महाविद्यालयात मुलींशी गैरवर्तन प्रकरणावरून ठाकरे शिवसेनेचा पोलीस स्टेशनमध्ये संताप**

नगर - मुलींना त्यांचे पालक शिक्षण, करियरसाठी महाविद्यालयात पाठवतात. मात्र शासकीय असणाऱ्या महाविद्यालयात जर स्टाफमधील नराधमच अल्पवयीन असणाऱ्या विद्यार्थिनींकडे वाकड्या नजरेने पाहत छेड काढत असतील तर अशा नराधमांना 'शिवसेना स्टाईल'ने चोप देण्यात येईल, असा इशारा ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख किरण काळे यांनी दिला आहे.




मंगळवारी शहरातील एका महाविद्यालयात मुलींशी गैरवर्तनाचा प्रकार उघडकीस आला. शिवसैनिकांसह काळे संबंधित महाविद्यालयात गेले. शिवसैनिक पोहोचण्यापूर्वीच पोलिसांनी संबंधित आरोपीला ताब्यात घेत कोतवाली पोलीस स्टेशनला आणले. तद्नंतर काळे शिवसैनिकांसह कोतवालीत दाखल झाले. यावेळी पीडितांसह पालकांनी पोलीस स्टेशन आवारात गर्दी केली होती. त्यांनी आपली कैफियत काळे यांना सांगितली. यानंतर काळे यांनी पोलीस निरीक्षक दीपक दराडे यांच्याकडे आरोपींवर कायदेशीर कारवाई करत पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली अन्यथा आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा दिला. या मागणीनंतर संबंधित आरोपीवर रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

किरण काळे म्हणाले, येथून पुढे अहिल्यानगर शहरात आमच्या आया, बहिणींकडे कोणी वाकड्या नजरेने पाहिले तर त्याला शिवसैनिक चोप देतील. लाडक्या बहिणींवर निवडणुकीपुरते प्रेम दाखवणाऱ्या महायुती सरकारच्या राज्यात माता, भगिनी सुरक्षित राहिलेल्या नाहीत. गृह खाते जर विकृत, गुन्हेगारी प्रवृत्तींवर वचक निर्माण करू शकत नसेल तर महिलांच्या संरक्षणासाठी शिवसैनिक वेळप्रसंगी कायदा हातात घेण्यास मागे पुढे पाहणार नाहीत.

**हेल्पलाईन नंबर जारी :** शहरात कुठेही महिलांशी गैरवर्तन, छेडछाड होत असतील तर ९०२८७२५३६८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. पीडितांचे नाव गुप्त ठेवले जाईल, अशी माहिती विलास उबाळे यांनी दिली आहे.

# प्राध्यापकानेच केला विद्यार्थिनीचा विनयभंग

नगर - शहर परिसरातील एका विद्यालयातील प्राध्यापकाने कॉलेजमधील वर्ग मित्रांनी एकत्र काढलेला फोटो १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीस मोबाईलमध्ये दाखवून हा फोटो एचओडीला दाखवला तर परीक्षेला प्रॉब्लेम येईल, असे सांगून मी तुला यात फसू देणार नाही, असे म्हणून तिचा हात धरुन तिला उत्पन्न होईल, असे वर्तन करुन तिचा विनयभंग केल्याची घटना शहर परिसरातील एका विद्यालयात १० व १५ एप्रिल रोजी घडली.

याबाबत पीडित अल्पवयीन मुलीने कोतवाली पोलीस ठाण्यात प्राध्यापकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

शहरातील एका विद्यालयात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीस प्राध्यापकाने कॉलेजच्या वर्कशॉपमध्ये बोलावून कॉलेजमधील वर्गमित्रांनी एकत्र काढलेला फोटो मोबाईलमध्ये दाखवून 'तुमचा हा फोटो एचओडीला दाखवला तर तुम्हाला परीक्षेला प्रॉब्लेम येऊ शकतो', असे म्हणून त्या मुलीचा हात धरला व 'तू टेन्शन घेऊ नकोस, मी तुला फसू देणार नाही', असे म्हणून तिचा विनयभंग केला. त्याच दिवशी तिला पुन्हा कॉलेजच्या गोडाऊनमधील मशिनच्या आडोशाला बोलावून तिच्याशी अश्लील वर्तन करुन तिचा विनयभंग केला. ही घटना पीडित मुलीने तिच्या पालकांना सांगितली. तसेच त्या प्राध्यापकाने केडगाव परिसरात राहणाऱ्या व कॉलेजमध्ये शिकणाऱ्या आणखी एका विद्यार्थिनीचाही विनयभंग केल्याची माहिती समोर आली. याप्रकरणी पोलीस ठाण्यात पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीवरुन विनयभंगाचा गुन्हा दाखल केला.

## गोरक्षनाथ भाकरे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - झारेकरगल्ली येथील रहिवासी गोरक्षनाथ गुलाबराव भाकरे (वय ४९) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. सामाजिक व धार्मिक कार्याची त्यांना आवड होती. तसेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, भाऊ, सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे.

## दिलीप वतारे यांचे दीर्घ आजाराने निधन

श्रीरामपूर - श्रीराम मंदिर चौकातील नारळाचे व्यापारी दिलीप आदिनाथ वतारे (वय ६१) यांचे दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले.



एस.टी महामंडळातील सेवानिवृत्त बसचालक तानाजी वतारे व साई कॉर्नर येथील रिक्षाचालक अशोक वतारे यांचे बंधू, पंकज वतारे यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, सुन, पुतणे, जावई , नातवंडे असा परिवार आहे.

## कांतीलाल कुऱ्हे यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर - साई कॉर्नर येथील गार्गी स्टोअर्सचे मालक कांतीलाल जिजाबा कुऱ्हे (वय ६९) यांचे हृदयविकाराने निधन झाले.



सीडीजे कॉमर्स कॉलेजचे सेवानिवृत्त प्रा.नंदकिशोर कुऱ्हे, दत्तात्रय व केशव कुऱ्हे यांचे बंधू, गोपाळ व दिपक कुऱ्हे यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मेडिकल दुकान फोडून रोख रकमेची चोरी

नगर - बंद दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला आतील सामनाची उचकापाचक करुन ड्रॉवरमध्ये ठेवलेली ८ हजार ५०० रुपये किमतीची रोख रक्कम चोरुन नेली. ही घटना नगर स्टेशन रोडवरील शिवनेरी चौकातील श्रीनाथ मेडिकल दुकानात १० एप्रिल रोजी रात्री १२ ते ११ एप्रिल सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत कार्तिक विकास घोडके (वय २६, रा. हर्षदा पार्क, घर नंबर ७, निर्मलनगर, सावेडी, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की त्यांचे स्टेशन रोडवरील शिवनेरी चौक येथे श्रीनाथ मेडिकल नावाचे दुकान आहे. तसेच दुकानात पवन संजय खताडे (रा. गजानन कॉलनी, आगरकर मळा, स्टेशन रोड) हा कामाला आहे. १० एप्रिल रोजी घोडके हे खासगी कामानिमित्त पुणे येथे गेले. त्या दिवशी पवन हा मेडिकलमध्येच होता. दुसऱ्या दिवशी सकाळी पवन याने फोन करुन सांगितले की, मेडिकलच्या शटरचे लॉक तुटलेले असुन, शटर उचकटलेले आहे. तुम्ही लवकर या. घोडके हे लगेच मेडिकल दुकानात आले. त्यांना शटरचे लॉक तुटलेले दिसल्याने त्यांनी आत जाऊन पाहिले असता ड्रॉवरमधील आठ हजार पाचशे रुपये त्यांना दिसून आले नाही. त्यामुळे त्यांची खात्री झाली की चोरट्याने शटरचे लॉक तोडून आतील रक्कम चोरून नेली.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी कार्तिक घोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद केली.

## मुरुमाचा उपसा करणाऱ्या जेसीबीसह एक ताब्यात

नगर - विनापरवाना बेकायदेशीररित्या शासकीय गौण खनिज मुरुमाचा उपसा करणारा जेसीबी पकडला. या कारवाई एकास ताब्यात घेतले तर एक पसार झाला आहे. ही कारवाई नगर तालुक्यातील नांदगाव शिवारातील के. के. रेंज येथे १५ एप्रिल रोजी केली. याबाबत अप्पर कॅम्प के के रेंज चे जितेंद्र रघुवीर सिंग (रा. खारेकर्जुने शिवार, ता. नगर) यांनी दिली. फिर्यादीत म्हटले आहे की, प्रथमेश कुंडलिक व्यवहारे (वय २३) व प्रवीण बबन चौधरी (दोघे रा. ढवळपुरी. ता.पारनेर) हे त्यांच्याकडील जीसीबी (क्र. एमएच १६, एफ ४३४) ने नांदगाव शिवारातील के. के. रेंजमध्ये शासकीय गौणखनिज मुरुम उपसा करीत असताना मिळून आले. या कारवाईदरम्यान प्रवीण चौधरी हा पसार झाला. याप्रकरणी जितेंद्र सिंग यांच्या फिर्यादीवरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस हवालदार अडबल करीत आहे.


## शिवनेरी चौकातून मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व मिरवणूक असल्याने शिवनेरी चौकात मस्जिद जवळ रस्त्याच्या कडेला लावलेली होंडा कंपनीची सीबी शाईन मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी पी ८७ ३६) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात शुभम सोमनाथ नागले (वय २९ रा. आनंदनगर, वसंत कॉम्प्लेक्स, मल्हारचौक, स्टेशनरोड अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चोरीचा गुन्हा दाखल केला.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

नगर - कै. बाळासाहेब ठाकरे प्राथमिक शाळा (मनपा) गांधीनगर, बोल्हेगाव, अहमदनगर येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी युनियन बँक एस.सी. एस.टी. एम्प्लॉइज वेल्फेअर असोसिएशन पुणे झोन युनिटचे पदाधिकारी अतुल जाधव, विशाल साबळे, ग्यानोजी गायकवाड व भगवान शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक अक्षय सातपुते उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा सामाजिक बांधीलकी जपत युनियन बँक एस.सी. एस.टी. कर्मचारी संघटना पुणेमार्फत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.


कै. बाळासाहेब ठाकरे प्राथमिक शाळा (मनपा) गांधीनगर, बोल्हेगाव येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

संघटनेचे जनरल सेक्रेटरी रुपेश नागमोडे, अध्यक्ष धर्मेंद्र चव्हाण व इतर पदाधिकारी यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी मोलाचा वाटा उचलला.

## उधारीचे पैसे न दिल्याने सहा जणांकडून एकास मारहाण

नगर - उधारीचे पैसे न दिल्याच्या रागातून सहा जणांनी एकास शिवीगाळ दमदाटी करीत लोखंडी पाईप व लाकडी दांडक्याने व लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही घटना नगर तालुक्याची शिराढोण येथे १३ एप्रिल रोजी सायंकाळी घडली. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात दीपक एकनाथ क्षीरसागर (वय ३८, रा. शिराढोण ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुल म्हस्के, कृष्णा म्हस्के, पप्पू राजापुरे (तिघे रा. दहिगाव तालुका नगर), विशाल (पूर्ण नाव माहित नाही) व अन्य दोन अनोळखी इसम यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ११७ (१), १८९ (२), १९०, १९१, ११८ (१) ११५, ३५१ (२) (३) ३५२ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली पुढील कारवाई पोलीस हवलदार मंगेश खरमाळे करीत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### हाडांच्या मजबुतीसाठी

दही हाडे मजबूत करण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे, कारण त्यात प्रथिने, कॅल्शियम, रिबोफ्लेविन आणि व्हिटॅबीन बी६ आणि बी१२ यांसारखे पोषक घटक असतात. दही आणि गुळ एकत्र खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि शरीराला ऊर्जा मिळते. गुळ आणि दही एकत्र सेवन केल्याने रक्ताची कमतरता दूर होऊन हिमोग्लोबीनची पातळी वाढते. दह्यात आणि गुळात कॅल्शियम असल्यामुळे या दोन्ही पदार्थांचे एकत्र सेवन हाडे मजबूत करण्यास मदत करते. त्याचप्रमाणे रक्तदाबही नियंत्रीत राहतो.

## पाककला

### पोटॅटो चिज सॅण्डविच

**साहित्य :** पाच, सहा उकडलेले बटाटे, १/२ टिस्पून जिरे, १/२ टिस्पून तिखट, १/२ लिंबाचा रस, थोडी कोथिंबीर, ४ हिरव्या मिरच्या, थोडे मोझेरेला चीज, लोणचा मसाला, मीठ

**कृती :** पाच, सहा उकडलेले बटाटे स्मॅश करावे. नंतर जिरे, तिखट, लिंबाचा रस, कोथिंबीर, हिरव्या मिरच्या, थोडे मोझेरेला चीज, एक चमचा लोणचा मसाला आणि मीठ मिसळून छान मिक्स करा. सँडविचच्या दोन्ही बाजू सोनेरी तपकिरी रंगावर भाजून घ्याव्या.

## वास्तू

### लिंबू मिरची का लावतात?

* लिंबू मिरची शक्तीशाली मानली जाते. घराबाहेर लावल्याने नकारात्मकता दूर होण्यास मदत होते.

* लिंबू मिरची लावल्याने पाहणाऱ्याची वाईट नजर घरावर अथवा दुकानावर पडत नाही.

## सल्ला

इडली-डोश्याच्या पिठाचा आंबटपणा संतुलित करण्यासाठी त्यात थोडा रवा घाला.

## सौंदर्य

ॲपल साइडर व्हिनेगर हे केसांसाठी फायदेशीर आहे. याचा वापर केल्याने केसां मध्ये घाम येण्याची समस्या कमी होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, ज्येष्ठा अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. १८ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आरोग्य उत्तम राहील. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. व्यापार व्यवसायात बरकत येईल. अपेक्षेनुसार कार्ये होतील.

**वृषभ :** इच्छित कार्य होण्यास थोडा विलंब लागेल. कामात पूर्ण समर्पणभाव ठेवा. अनपेक्षित खर्च होण्याची शक्यता. राजकीय व्यक्तींना लाभ होईल.

**मिथुन :** आपले काम धाडसाने कराल. अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील.

**कर्क :** महत्त्वाच्या कामांमध्ये आपणास घरच्यांचा पाठींबा मिळेल. आपण ठरावीक वेळेत काम पूर्ण कराल. आरोग्यविषयक तक्रारी राहतील.

**सिंह :** अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधीच्या कामात स्थिती अनुकूल राहील. पोरकटपणा नुकसानीस कारणीभूत ठरेल.

**कन्या :** शत्रू पराभूत होतील. दृष्टीकोनात बदल केल्याने निश्चितच यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**तूळ :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल बातम्या कळतील. नोकरदार व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे.

**वृश्चिक :** खर्चावर नियंत्रण न ठेवल्याने आर्थिक तंगी येईल. सामाजिक कार्यात यश मिळेल. खर्च अधिक होईल. घराच्या सजावटीसाठी योजना तयार कराल.

**धनु :** खर्च अधिक होईल. कर्ज देणे अंगलट येईल. निष्कारण चिंता त्रास देतील. सुख-शांतीचे वातावरण राहील. भातृचिंता सतावेल.

**मकर :** अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. व्यापार-व्यवसायात सुरळीत होईल. राजकीय व्यक्तींसाठी दिवस उत्तम राहिल.

**कुंभ :** मानसन्मानात वाढ होईल. भावनेच्या भरात नुकसान होण्याची शक्यता आहे. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**मीन :** राजकारणी व्यक्तींना आपल्या उद्देशात यश मिळेल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. मानसिक सुख-शांतीचे मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरुजी : पराकोटीच्या विरोधाभासाचं उदाहरण सांगा बघू
बंड्या : सर, पाकिस्तानच्या नेत्याचं नाव शरीफ आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी


* युनोच्या निशस्त्रीकरण युवा परिषदेमध्ये भारताच्या वतीने स्थायी प्रतिनिधी म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे? - अनुपम रे

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१५७ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ■ | ९ | |
| १० | | | ■ | ११ | १२ | | ■ |
| १३ | | ■ | १४ | | | ■ | १५ |
| | ■ | १६ | | ■ | १७ | १८ | |
| ■ | १९ | | ■ | २० | | | ■ |
| २१ | | | | | ■ | २२ | २३ |
| २४ | | | ■ | ■ | २५ | | |

शब्दगंध क्र. ७१५६ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) महाराष्ट्रातील एक भाग ५) केशवर्धक तेल देणारी एक वनस्पती ७) वाकलेला; झुकलेला ८) धब्बा; कलंक; वस्तू ९) वाईट सवय; खोड १०) भरपूर; खूप; मुस्लीम पुरुषाचे एक नाव ११) बसल्या बसल्या येणारा झोपेचा झटका १३) राजाची बायको; क्वीन १४) चेतनायुक्त; ज्यात प्राण आहे असा १६) करडई, तीळ आदी धान्यांतील स्निग्धांश १७) कपड्यावर वगैरे केलेली वेलबुट्टी १९) घाण; विष्ठा २०) तारणारा; वाचविणारा २१) अनुवाद करणारा २२) गव्हाचे कणीदार पीठ २४) आयात होणाऱ्या मालावरील कर २५) मोजणारा; गणती करणारा

**उभे शब्द :-** १) मन तृप्त होईल इतके २) एक सुगंधी फूल ३) अनेक कुटुंबे रहात असलेले मोठे घर ४) दुरुस्ती ५) धनीपणा; स्वामित्व ६) सर्पाने टाकलेली त्वचा १२) कमी वेळेत; जलदी १४) बऱ्याच काळापासून मनात राहिलेले दुःख १५) व्यवसाय; उद्योग १६) दिव्यात तेल घालणे, वाती करणे आदी दिवा लावण्यापूर्वीची कामे १८) केळी कुसकरून त्यात साखर, दूध घालून केलेले खाद्य १९) वाळविलेले द्राक्ष २०) दही घुसळून त्यातून लोणी काढल्यानंतर राहिलेला द्रव २१) एक प्राणी; शेळी; बकरी २३) धागा; तंतू; दोरा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जो व्यक्ती स्वत:ला ओळखू शकत नाही तो संसाराला कसा काय ओळखेल?

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### भरपूर पाणी असलेले मलाईदार शहाळे कसे ओळखायचे?

उन्हाळ्यात वाढत्या उष्णतेमुळे आपल्या शरीरातील पाण्याचे प्रमाण हळुहळु कमी होत जाते. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ न देण्यासाठी आपण स्वतःला हायड्रेटेड ठेवणे गरजेचे असते. उन्हाळ्यात शरीर हायड्रेटेड ठेवण्यासाठी आपण भरपूर पाणी, फळांचे रस, शहाळाचे पाणी जास्तीत जास्त पिण्याचा प्रयत्न करतो.

शहाळाचे पाणी उन्हाळ्यात शरीराला आतून थंड ठेवण्याचे काम करते. अनेक आरोग्य तज्ज्ञ देखील दररोज सकाळी रिकाम्या पोटी शहाळाचे पाणी पिण्याचा सल्ला देतात. यामुळे रोग प्रतिकारशक्ती वाढवते, चयापचय सुधारते आणि वजन कमी होते असे मानले जाते. यासोबतच त्वचेमध्ये चमकही येते. अशा परिस्थितीत, उन्हाळ्याच्या ऋतूत शहाळाच्या नारळाची मागणी खूपच वाढते, ज्यामुळे इतर ऋतूंच्या तुलनेत उन्हाळ्यात ते अधिक महाग विकले जाते. आपण हे शहाळाचे पाणी पैसे देऊन विकत घेतो पण कधीकधी आपली फसवणूक होते. अनेकांना जास्त पाणी असलेले कोवळे खोबरे किंवा नारळ कसे ओळखायचे हे माहित नसल्यामुळे अनेकवेळा ते बाजारातून नारळ विकत घेऊन घरी नेतात, त्यात फारच कमी पाणी असल्याचे दिसून येते. शहाळे आतून छान मलईदार व भरपूर पाणी असलेले आहे शहाळावर तपकिरी डाग असलेले शहाळे घेऊ नये. हिरवा नारळ खरेदी करताना सर्व बाजूंनी नीट तपासून मगच तो खरेदी करावा. त्यावर तपकिरी रंगाचे डाग असल्यास असा नारळ विकत घेऊ नका. जर प्रत्येकाला असे डाग असतील तर असा नारळ घ्या ज्याला कमी डाग दिसत असेल. खरं तर, नारळावर दिसणारा हा तपकिरी रंग त्याच्या जास्त पिकल्याचं लक्षण आहे, म्हणजे त्यात पाणी कमी आहे. नारळ जसजसा परिपक्व होतो तसतसा त्याचा आकार लांब आणि लांबट होतो. मोठ्या नारळात पाण्याचे प्रमाण कमी असल्याने नेहमी गोल आकाराचे नारळ निवडावेत. दुकानात पूर्ण गोल नारळ मिळणे शक्य नसले तरी. या प्रकरणात, कमी तिरपे आणि लांब नारळ निवडावेत. हिरव्या आणि ताज्या नारळात जास्त पाणी असते, त्यामुळे तो हलवल्यावर आवाज येत नाही. अशा परिस्थितीत जेव्हाही आपण नारळ पाणी विकत घेण्यासाठी जाल तेव्हा नारळ चांगले हलवून पहा, जर त्यातून पाण्याचा आवाज येत असेल तर समजून घ्या की त्यात पाण्याचे प्रमाण खूप कमी आहे. ताज्या हिरव्या नारळाला कोणत्याही प्रकारचा वास येत नाही. अशा परिस्थितीत, बाजारातून नारळ खरेदी करताना, दोन्ही बाजूंनी वास घेण्याचा प्रयत्न करा. जर त्यातून कोणत्याही प्रकारचा तीव्र वास येत असेल तर तो विकत घेऊ नका. तसेच, बोटाने दाबल्यावर ते मऊ वाटत असल्यास, ते विकत घेऊ नका.

छोट्या नारळात कमी पाणी असते, पण मोठ्या नारळात जास्त पाणी असतेच असे नाही. म्हणूनच नारळ खरेदी करताना नेहमी त्याचा मध्यम आकार निवडावा, कारण त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असण्याची शक्यता असते.

## काटेरी झाड

एका सागवानाच्या झाडाजवळच एक काटेरी झाड होतं. सागवान त्या झाडाला खिजवायला म्हणालं तुझा कोणाला काही उपयोग नाही. माझं लाकुड पहा. उत्तम टिकाऊ म्हणुन प्रसिद्ध आहे. लोकांना त्यांच्या घरातल्या वस्तु माझ्याच लाकडाच्या असलेल्या आवडतात.

काटेरी झाडाने लगेच उत्तर दिले. बरंय माझं लाकुड प्रसिद्ध नाही तेच. त्यामुळे मला कसली चिंता नाही बघ. तुझ्यासारखी कधी कोणी लाकूडतोड्या येतो आणि माझ्यावर कुऱ्हाड चालवुन माझे तुकडे घेऊन जातो अशी कसलीच भीती नाही.

एखादा लाकूडतोड्या असा तुला घेऊन जाईल आणि सुताराला लाकडं विकेल तेव्हा तू सुद्धा अशीच प्रार्थना करशील कि पुढच्या जन्मी माझ्यासारखं साधं झाड व्हावंस.

तात्पर्य : स्वत:ला कधीच सर्वगुणसंपन्न समजू नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



रोग बढ़ता ही गया। वे मेरे पास आये। हम सबने मिलकर महाराज जी से प्रार्थना की। महाराज जी की प्रेरणा पाकर हम बच्चे को कलावती सरन अस्पताल दिल्ली में ले गये और भरती करा दिया। वहाँ उस छोटे से बच्चे के दोनों फोड़ों का ऑपरेशन किया गया और वह कुछ दिन पश्चात बिल्कुल भला-चंगा हो गया।

यदि हम सच्चे दिल से गुरु को स्मरण करें, तो वह हमसे दूर नहीं है और ज़रूर हमारी सहायता करता है। महाराज जी का एक शेर है :

मिलेगा, रूह को परवाज़ दे के देख ज़रा । .
करीब है, उसे आवाज़ दे के देख ज़रा ।।
मंजिले-नूर (नज़्म-५०)

संतों का कार्यक्षेत्र अवतार पुरूषों से सर्वथा भिन्न और स्वतंत्र होता है। अवतार केवल इस लोक में ही कार्य करते हैं जिससे इस संसार का कार्य सुचारू और व्यवस्थित ढंग से चल सके। भगवान

### रुहानी डॉक्टर

श्रीकृष्ण ने बड़े स्पष्ट शब्दों में कहा है कि जब-जब धर्म की हानि होती है उन्हें इस संसार में आना पड़ता है जिससे कि बिगड़े हुए संतुलन को ठीक करके भक्तों का उद्धार और दुष्टों का संहार किया जा सके। इसी प्रकार रामचरितमानस में भगवान राम के बारे में जिक्र है कि संसार में पाप बहुत बढ़ जाने पर उन्होंने पृथ्वी पर अवतार लिया। अवतार केवल अच्छाई और धर्म की पुनस्थापना के लिये ही आते है लेकिन संसार- रूपी जेल के द्वार खोल कर जीवों को उच्च आध्यात्मिक मंडलों में ले जाने में वे पूरी तरह असमर्थ हैं। यह कार्य पूर्णतया संतों के पास है जो चेतन होकर प्रभु का कार्य करते हैं और उसी की भक्ति का उपदेश देते हैं क्योंकि इसी तरीके स कर्मों के प्रभाव को समाप्त किया जा सकता है। एक मुस्लिम फकीर ने कहा हैः-

तुम बरोजे हिसाब ई अमर शवद मालूम, कि बुवद सल्तनते बे हिसाब दरवेशी ।

अन्त समय जब कर्मों का हिसाब हुआ तो यह समझ आया कि दरवेशों की सल्तनत में कर्मों की गिनती नहीं होती।

फिर कहा है:-

उसकी उपस्थिति में कर्म ऐसे भागते हैं जैसे शेर के आने पर कर्मों के फल से कोई बच नहीं सकता, यहाँ तक कि भूत, प्रेत, दैत्य, राक्षस, गंधर्व, किन्नर, यक्ष या देवता भी नहीं। दिव्य, सूक्ष्म और पारलौकिक शरीरों में भी जीव को ब्रह्माण्ड में जो कि अंड और पिंड के ऊपर तीसरा मंडल है, रह कर अपने कर्मों का फल भोगना पड़ता है। कर्मों के चक्र से छूटने के लिये वे भी मनुष्य देह में आने की अभिलाषा व इंतज़ार करते हैं क्योंकि मनुष्य जन्म में ही किसी प्रभुरूप हस्ती से मिलने की संभावना है जो उस रूहानी रास्ते के रहस्य अर्थात् नाम या शब्द का भेद बता सकता है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

दिल नम्बर डायल करते है। हमारा लेता है। किसी व्यक्ति की स्थान मार में एक मोबाइल नम्बर केही ही हो सकते। जब किसी व्यक्ति के पर कोचाहे वह ब्रह्मांड में कहीं पर भी किसी को सम्पर्क करना चाहते हैं तो उसका मोबाइल नम्बर हा उस व्यक्ति को चाहे वह विश्व के किसी कोने में हो ढूँढ़ लेता है। कि या उसका चित्र एक अद्भुत मोबाइन नम्बर है। सारे संसार में एक मो नहीं हो सकते। ऐसे ही एक शक्ल के दो व्यक्ति नहीं हो सकते। जबकि देख कछ सोचते हैं तो हमारे ये विचार उस व्यक्ति को चाहे वह ब्रह्मांड में तक पहुँच जाते हैं। एक जगह बैठ कर रडार से उस क्षेत्र की रक्षा कर सकते रडार से सारे विश्व की आत्माओं की एक स्थान से रहते हुये मानसिक विकार सकते हैं। विचार कहाँ से आते हैं? जन्म लेते ही मनुष्य के मन में विचार चलने लगते हैं और मनुष्य की मृत्यु तक चल हैं। विचारों की हकीकत क्या है।

विचार कहाँ से आते हैं और विचार शरीर को कैसे चलाने के हमारी आत्मा में संस्कार नाम का एक केन्द्र है। यह रिकॉर्ड केन्द्र है। यह रिकॉर्ड केन्द्र हम आँख, नाक, कान, गला, त्वचा और सहस्त्रार केन्द्र से

### मूल आधार चक्र

जुड़ा है। हम जो कुछ भी देखते हैं, सला। हैं, बोलते हैं, सूंघते हैं और शरीर के स्पर्श से जो ज्ञान प्राप्त होता है, वह संस्कार में रिकॉर्ड है। जाता है। ब्रह्मांड में हमारे बारे कोई कुछ भी सोचता है वह हमारे दिमाग में स्थित सहस्त्रार केन । प्राप्त कर लेता है और संस्कार में रिकॉर्ड कर देता है। संस्कार केन्द्र से विचार चेतन मन में आते । हैं। चेतन मन हमारी आँखों से जुड़ा हुआ है। दूसरे शब्दों में कह सकते हैं आँखें चेतना मन की । प्रत्यक्ष कर्म इन्द्रियां हैं। मन के विचार आँखों में तैरते रहते हैं।

चेतन मन को अच्छे व बरे का । कुछ पता नहीं होता बस विचार आते रहते हैं। बुद्धि शक्ति मन के हर संकल्प व योजना को चक। करती है और जो सही लगता है वही मन को करने के लिये कहती है। बुद्धि से फाइनल हानक । बाद संकल्प हमारी आँखों में आते हैं। आँखों का कनेक्शन हमारे चेहरे की कोशिकाओं से है। शरीर की सभी संदेशवाहक नस हमारे चेहरे से जुड़ी हुई हैं। बुद्धि द्वारा आदेश मिलने के बाद विचार आँखों से पूरे चेहर का। मांसपेशियों में चले जाते हैं और चेहरे की मांसपेशियों से शरीर के अलग-अलग हिस्सा का कर्म की प्रेरणा मिलती है और कर्मइन्द्रियां उसी अनुसार कार्य करती हैं। मन में गुस्सा आना चेहरा तमतमा उठता है और उसके बाद हमारे हाथ की मुट्ठियां भीच उठती है दूसरा पर आक्रमण करने के लिये। जब हम किसी व्यक्ति को सुनते हैं या बात कर रहे होते हैं ता समय एक तो उस द्वारा बोला गया हर बोल और संकल्प उसी रुप में रिकॉर्ड हो रहा होता । दूसरा वह जो बोल रहा है उसे हम बुद्धि द्वारा परख रहे होते हैं और हमें उसकी जो बात जचता। वह भी सम्बन्धित केन्द्र में रिकॉर्ड हो रही होती है। उसकी जो बात नहीं जंची, उसका उत्तर देंगे, अन्दर ही अन्दर बुद्धि द्वारा सोच रहे होते हैं, और यह जो उत्तर सोच रहे होते है, वह । संस्कार में रिकॉर्ड हो रहा होता है। प्रकृति नियम से काम करती है। कोई आवाज कही सभा आये, चाहे सामने से, चाहे पीछे से, चाहे ऊपर से, चाहे पाताल से, चाहे आकाश से आये पर उसे सुनने का एक ही रास्ता है, वह है कान ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदीय बालसंस्कार

**अथास्य जातकर्म प्राजापत्येन**
**विधिनां कुर्यात अपिचं ।**

अष्टांग संग्रह, उत्तरस्थान १/१०

बालकाच्या जन्मानंतर जे वैदिक कर्म, यज्ञ-योगादि कार्य केले जाते, त्यास जातकर्म संस्कार म्हणतात.

जन्मलेल्या बाळाच्या नाका-तोंडावर असलेला कफ कापसाने बाजूला करावा. त्याने बाळाला श्वास घेणे अवजड जात नाही. बाळाच्या नाका-तोंडातील कफ साफ केल्यावर बाळ रडायला लागते व त्याची श्वासोच्छ्वासाची क्रिया सुरू होते. एखाद्या वेळेस जर बाळ रडले नाही, तर बाळाच्या पाठीवर हलकेच मारावे किंवा पाणी शिंपडावे, यामुळे बाळ लगेचच रडायला लागते. नंतर बाळाच्या नाभीपासून चार-पाच इंच अंतरावर चिमट्याने (Cord-clamp) पकडावे. मधे थोडेसे अंतर ठेवावे व परत दुसऱ्या बाजूला चिमट्याने पकडावे व दोन्ही चिमट्यांच्या मधला नाळेचा भाग कातरीने (सीझरने) कापावा व त्यानंतर नाळ लोंबकळत राहू नये म्हणून बाळाच्या नाभीच्या थोड्याशा पुढील अंतरावर नाळ दोऱ्याने पक्की बांधावी

### नवजात बाळाची काळजी कशी घ्यावी?

व उरलेली नाळ कापून टाकावी. निर्जंतुक औषध टाकावे. त्यानंतर कोमटशा स्वच्छ सुती कपड्यात बाळाला गुंडाळावे व बाळाचे वजन करावे. यावेळी बाळाच्या दीर्घायुष्यासाठी, आरोग्यरक्षणासाठी मनामध्ये प्रार्थना करावी. नंतर बाळाला वचा, शंखपुष्पी, सारीवा, पिंपळी, ब्राह्मी, सुवर्णभस्म, मध यांपासून बनविलेल्या 'दुर्वांकूर सुवर्णप्राशन'चे चार थेंब पाजावे. हे जर देण्यास जमले नाही, तर सुवर्णसिद्ध जल बाळाला पाजावे. याने बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. बाळ दीर्घायुषी होते.

बाळाची बुद्धी, स्मृती वाढते. यानंतर बाळाच्या अंगाला बला तेल किंवा दुर्वांकुर बेबी ऑईल हळुवारपणे चोळावे व बाळाला हळद, मंजिष्ठा, गुलाबपुष्प, अगरू, चंदन, नागकेशर, मसूरडाळ अशी औषधे घालून तयार केलेले 'दुर्वांकुर बेबी उटणे' लावावे व त्यानंतर कोमट पाण्याने अंघोळ घालावी. अंघोळीच्या पाण्या मध्ये कडुनिंबाची पाने बारीक करून टाकावीत.

अंघोळ घालताना बाळाच्या नाका-तोंडात पाणी जाणार नाही, याची काळजी घ्यावी. यामुळे बाळाची त्वचा रूक्ष न होता कांतियुक्त होते व जन्म नंतर त्याच्या अंगावर राहिलेला विशिष्ट प्रकारचा पांढरा चिकट पदार्थ निघून जाण्यास मदत होते. यालाच 'जातकर्म संस्कार' असे म्हणतात.

आईच्या उदरातून जन्म घेताना बाळ थकलेले असते, त्यामुळे त्याचा वातप्रकोप होतो. बलायुक्त बेबी ऑईल अंगाला लावून सुगंधित औषधी उटणे लावून अंघोळ केल्यामुळे वातशमनाचे काम चांगले होते व बाळाला आलेला थकवा जाऊन बाळाला झोपदेखील चांगली येते.

अंघोळ झाल्यानंतर बाळाला कोरड्या सुती कापडाने हलकेसे पुसून मऊ, सुती, सैल झबली घालावीत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी’ च्या ‘सद्भावना’च्या स्नेहमेळाव्यास सभासदांचा प्रतिसाद



श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटीच्या सद्भावना पॅनलचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता.

नगर – श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी लि., च्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक रिंगणातील सद्भावना पॅनलचा स्नेहमेळावा राजेंद्र बोथरा व मित्र परिवाराने सिताबन लॉनमध्ये आयोजित केला होता.

पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीस सामोरे जात आहे. यामधील राजकमल मणियार व शोभा राठी या महिला राखीव मतदारसंघामधून साईनाथ कावट हे विमुक्त जाती व भटक्या जमाती मतदार संघामधून अनुरिता झगडे या इतर मागासवर्गीय विभागामधून तर देवराव साठे हे अनुसूचित जाती/जमाती विभागामधून बिनविरोध निवडून आले आहेत. सर्वसाधारण मतदार संघातील सद्भावना पॅनलचे उमेदवार असे – राजेंद्रकुमार कंत्रोड, विश्वनाथ कासट, राजेंद्र गुजराथी, प्रकाश गांधी, ओमप्रकाश चांडक, लक्ष्मीकांत झंवर, सुधीर झालानी, अनुराग धूत, श्रीगोपाल धूत, प्रदिप पंजाबी, ॲड.अशोक बंग, किसनलाल बंग, गोपाल मणियार, राजेंद्र मालू आणि मधुसुदन सारडा.

श्रीगोपाल धूत म्हणाले, वै.डोंगरे महाराज यांच्या आशीर्वादाने आणि स्व.काकासाहेब धूत यांच्या प्रेरणेने ४० वर्षांपासून या सोसायटीची वाटचाल प्रगतीपथावर सुरू आहे. ध्येय कितीही उच्च असले तरी साधन शुध्द असले पाहिजे. माझी ही शेवटची निवडणूक आहे. सद्भावना पॅनलला एकमुखी मतदान करा. आजच्या मेळाव्यात सभासदांनी व्यक्त केलेल्या मनोगतांनी आम्ही सर्वच भारावून गेलो आहोत. मतदान करून हा आपलेपणा वृद्धींगत करा, असे आवाहन करतो.

मेळाव्यात कु.हर्षा गुजराथी, ब्रिजलाल सारडा, अनिल पोखरणा, प्रा.डॉ. शरद कोलते, मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, सीए अजय मुथा, ॲड.शरद पलोड, डॉ. श्यामा मंत्री, प्रा.मधुसूदन मुळे, राजेंद्र चोपडा, राजेंद्र बोथरा, डॉ.कैलास झालानी, डॉ.विजय भंडारी, श्यामसुंदर सारडा, डॉ.श्रीकांत गांधी, जितेंद्र बिहाणी, आदेश चंगेडिया, नंदकुमार झंवर, प्रविण बजाज, राजेश झंवर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन लक्ष्मीकांत झंवर यांनी केले. ओमप्रकाश चांडक यांनी आभार मानले. मेळाव्यात सीए रमेश फिरोदिया, आर.डी.मंत्री आदी उपस्थित होते.



छत्रपती शाहू कला क्रीडा संस्कृतिक सामाजिक मंडळ ट्रस्ट व शिवप्रेमी मुस्लिम मावळा प्रतिष्ठानच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सावली संस्थेतील गरजू विद्यार्थ्यांना शाळेय साहित्य भेट देण्यात आले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सावली संस्थेस शालेय साहित्य भेट

नगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू कला क्रीडा सांस्कृतिक सामाजिक मंडळ ट्रस्ट व शिवप्रेमी मुस्लिम मावळा प्रतिष्ठान शाहूनगर केडगावच्या वतीने सावली संस्थेतील शालेय मुलांना शाळेत शिक्षणासाठी लागणारे वह्या पुस्तक देऊन एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रतीक बारसे, महेश सोले, प्रकाश बिडकर, ॲड. विजय महाजन, दुर्वेश शेलार, संदेश बारसे, विशाल पाचारणे, जॅकी काकडे, समीर शेख, शरीफ पठाण, मौलाना रिजवान खान, निजाम शेख, सावली संस्थेचे नितीन बनसोडे उपस्थित होते.

प्रतीक बारसे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सावली संस्थेतील मुलांना शाळेत साहित्य वाटप करण्यात आले व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात शिक्षणाला प्रचंड महत्व दिले व त्या शिक्षणाच्या जोरावर आज जगात त्यांना सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखलं जाते म्हणून त्यांची जयंती वह्या पुस्तक वाटून साजरी करण्यात आली असल्याची भावना व्यक्त केली.



अहिल्यानगरचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सौरभ हराळ यांना दिल्ली येथे झालेल्या आशिया-पॅसिफिक अकादमी ऑफ ऑप्थाल्मोलॉजी (APAO) परिषदेत ’यंग रिसर्चर ॲवॉर्ड’ने सन्मानित करण्यात आले.

# अहिल्यानगरच्या डॉ. सौरभ हराळ यांना आंतरराष्ट्रीय ‘यंग रिसर्चर’ पुरस्कार प्रदान

नगर – अहिल्यानगरचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सौरभ हराळ यांना दिल्ली येथे झालेल्या आशिया-पॅसिफिक अकादमी ऑफ ऑप्थाल्मोलॉजी (APAO) परिषदेत ’यंग रिसर्चर ॲवॉर्ड’ने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या डोळ्यांच्या ॲलर्जीवरील (Eye allergy) नवीन उपचार पद्धतीच्या संशोधनासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. सौरभ हराळ यांनी ‘इंटरफेरॉन अल्फा 2b’ या नवीन औषधांवर संशोधन केले, जे पारंपरिक उपचारांपेक्षा अधिक प्रभावी ठरले. डोळ्यांची ॲलर्जी ही एक सामान्य पण त्रासदायक समस्या असून, लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत अनेकांना याचा त्रास होतो. सध्याच्या उपचारांमध्ये तात्पुरता आराम मिळतो, पण औषध थांबवल्यावर त्रास परत होतो. डॉ. हराळ यांच्या संशोधनाने या अडचणीवर प्रभावी आणि दीर्घकालीन उपाय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

परिषदेत जगभरातील नेत्ररोगतज्ज्ञांनी आपले संशोधन सादर केले होते, आणि डॉ. सौरभ हराळ हे सर्वात तरुण संशोधक होते. त्यांचे मूळ गाव अहिल्यानगर असून, त्यांनी दिल्लीत तीन वर्षे यशस्वी प्रॅक्टिस केल्यानंतर आता आपल्या गावात हराळ नेत्रालय, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर येथे सेवा देत आहेत. एम.एस. परीक्षेत सुवर्णपदक मिळवणारे डॉ. हराळ हे आपल्या जिल्ह्यासाठी आणि राज्यासाठी अभिमानाचा विषय आहेत.

# ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’ योजनेच्या प्रचारासाठी जलरथाचा शुभारंभ



मृदा व जलसंधारण विभाग व बीजेएसच्या संयुक्त विद्यमाने ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’ योजनेच्या प्रसारासाठी जलरथ तयार करण्यात आला असून याचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या हस्ते झाला.

नगर – दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना कायमस्वरुपी राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातही ही योजना राबविण्यात येत असून योजनेच्या प्रचार व प्रसारासाठी भारतीय जैन संघटनेने जबाबदारी स्विकारली आहे. मृदा व जलसंधारण विभाग व बीजेएसच्या संयुक्त विद्यमाने या योजनेच्या प्रसारासाठी जलरथ तयार करण्यात आला असून याचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या हस्ते झाला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी आकाश परदेशी, बीजेएसचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आदेश चंगेडिया, जिल्हाध्यक्ष प्रशांत गांधी, राज्य कार्यकारिणी सदस्य मनसुखलाल चोरडिया, विश्वजीत गुगळे, संजय शिंगवी, अमोल पटवा, दर्शन गांधी, नरेश सुराणा, नयन पोखर्णा, प्रसाद शहा, संतोष लोढा, आशिष राका, इपिटोम कंपनीचे अनुराग धूत, उपविभागीय अभियंता शिंदे, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, करण भळगट, आदिनाथ पवार, प्रतिक जगदाळे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया म्हणाले, जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना अतिशय प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. तलावातून गाळ काढल्याने पाणी साठवण क्षमतेत वाढ होण्यास मदत होईल. तसेच काढलेला गाळ शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पोहचविण्यात येणार आहे. त्यामुळे शेतीलाही याचा उपयोग होणार आहे. बीजेएसच्या सहकार्यातून ही योजना जिल्ह्यातील गावांमध्ये राबविण्यात येणार असून जलरथाव्दारे याचा प्रचार, प्रसार करण्यात येणार आहे.

आदेश चंगेडिया यांनी सांगितले की, दुष्काळमुक्तीसाठी भारतीय जैन संघटना मागील अनेक वर्षांपासून राज्यातील ग्रामीण भागात काम करीत आहे. याही वर्षी शासनाच्या सहकार्याने या योजनेच्या अंमलबजावणासाठी बीजेएसची टिम सज्ज झाली आहे. जलरथ गावोगावी जावून जनजागृती करणार असून आवश्यक अर्ज भरून घेत प्रशासनामार्फत मंजुरी मिळाल्यावर संबंधित गावांत गाळ काढण्याची मोहिम राबविण्यात येणार आहे.

या योजनेत जास्तीत जास्त गावे सहभागी होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

# बाबासाहेबांनी प्रतिशोध न घेता, न्याय आणि समतेच्या तत्त्वांवर संविधानाची निर्मिती केली

## प्रदीप जाधव यांचे प्रतिपादन



बीएसएनएल कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

### बीएसएनएल कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

नगर – बाबासाहेबांनी असंख्य अपमान व अडचणी सहन करूनही, कधीही कोणताही प्रतिशोध न घेता, न्याय आणि समतेच्या तत्त्वांवर आधारित संविधानाची निर्मिती केल्याचे प्रदीप जाधव यांनी सांगितले. तर बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती बीएसएनएल कार्यालय, अहिल्यानगर येथे बीएसएनएल व एससी-एसटी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात संविधानाच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधत संविधानाची प्रत उपस्थितांना वाटप करण्यात आले.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पणाने अभिवादन करुन दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी बीएसएनएलचे महाप्रबंधक चोंगड कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यांच्यासह एससी-एसटी वेल्फेअर असोसिएशनचे मुख्य सल्लागार प्रदीप जाधव, उपमहाप्रबंधक प्रशासन विश्वनाथ वाघ, उपमहाप्रबंधक राशीनकर, जिल्हा सचिव गजेंद्र पिसे, फायनान्स ॲडव्हायझर झोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाप्रबंधक चोंगड यांनी अध्यक्षीय भाषणात बाबासाहेबांचे विचार केवळ दलित-वंचितांसाठीच नव्हे, तर सर्व भारतीयांसाठी दिशादर्शक असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले की, आपल्या संविधानात समतेची बीजे रोवणाऱ्या बाबासाहेबांचे विचार आजच्या पिढीने आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे.

यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा कार्यक्रम घेण्यात आला. ज्यात कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात पिंपरकर, जगताप, शिपनकर, वाघ आदींनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जोशी, प्रशांत मेहरा, गौतम मिना, घोडके, अशोक पारधे, अनंतरे, प्रविण सोनवणे, कुलदीप सिंग, महिला वर्गातून वैशाली उदमले, मनीषा पिसे, शिला झेंडे, शिल्पा जावळे आदींसह बीएसएनएलचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र पिसे यांनी केले. थोरात यांनी आभार मानले.

# सुरेगावच्या दावल मलिक बाबांचा १७ एप्रिला जत्रा उत्सवाचे आयोजन



श्रीगोंदा – तालुक्यातील सुरेगाव येथील हिंदू-मुस्लिम समाज बांधवांचे श्रद्धास्थान, ग्रामदैवत असलेल्या दावलमलिक बाबा यांच्या जत्रा उत्सवाचे १७ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. येथील जत्रेला अनेक वर्षाची परंपरा आहे. जत्रेनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने बुधवारी रात्री बाबांची संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे.

त्यानंतर मनोरंजनासाठी श्रुती मुंबईकर हिच्या चंद्रकला ऑर्केस्ट्राचे १७ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. जत्रेनिमित्त संपूर्ण मंदिरावर व मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. जत्रेमध्ये लहान मुलांच्या खेळणी, महिलांसाठी सौंदर्य प्रसाधने, विविध प्रकारचे करमणूक करणारे प्रकार, खाऊची दुकाने, प्रमाणात पहावयास मिळतात भाविकांनी या यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अहिल्यानगरच्या डॉ. माधुरी ठोंबरे १७ एप्रिलला ‘दूरदर्शन सह्याद्रीवर’

## माता आणि नवजात शिशु आहार यावर करणार मार्गदर्शन



नगर – शहरातील आहारतज्ज्ञ डॉ. माधुरी ठोंबरे यांची पुन्हा एकदा दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर मुलाखतीसाठी निवड झाली आहे. माता आणि नवजात शिशु आहार, या विषयावर त्यांच्या मार्गदर्शनाचे थेट प्रक्षेपण १७ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता प्रसारित होणार आहे.

गेल्या वर्षीही डॉ. माधुरी ठोंबरे यांना या राष्ट्रीय मंचावर आमंत्रित करण्यात आले होते. यंदाही त्यांच्या कार्याची दखल घेत मुंबई येथील दूरदर्शन स्टुडिओमधून ही विशेष मुलाखत थेट प्रक्षेपित होणार आहे. त्यांच्या ज्ञानाची आणि अनुभवाची दखल घेणे हे केवळ संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे. मातांनी आणि नवजात बालकांच्या पोषणात नेमकी काळजी कशी घ्यावी, कोणते अन्नपदार्थ योग्य आहेत, चुकीच्या सवयींमुळे होणारे परिणाम यासारख्या विषयांवर डॉ. ठोंबरे मार्गदर्शन करणार आहेत.

# आधुनिक उपचारपद्धतीमुळे रोग निवारण मोठ्या प्रमाणात होत आहे

## डॉक्टर अशपाक पटेल यांचे प्रतिपादन; अल करम हॉस्पिटलतर्फे महात्मा फुले व डॉ. आंबेडकर जयंती निमित्त मोफत सर्वरोग आरोग्य शिबीर



अल करम हॉस्पिटलतर्फे महात्मा फुले व आंबेडकर जयंती निमित्त मोफत सर्वरोग आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले.

नगर – बदलती जीवनशैली आणि वातावरणातील बदलांमुळे मनुष्याची प्रतिकार शक्ती कमी होत आहे. विशेषत लहान मुलांमध्ये आजारांचे प्रमाण वाढतांना दिसत आहे. दुषित पाणी, फास्ट फूड, अस्वच्छता यामुळे आजारांची उत्पत्ती होतांना दिसते. या वेगवेगळ्या आजारांचे निदानही अत्याधुनिक मशिनरीद्वारे करता येत असल्याने उपचार करणेही आता सोपे होत आहे. उपचार वेळेत न झाल्याने आजार बळावतात. त्यासाठी अशा मोफत तपासणी शिबीराच्या माध्यमातून आजारांचे निदान वेळेत झाल्यास त्यावर उपचार करणे सोपे होणार आहे. त्यामुळे अशा शिबीरांची गरज आहे, असे प्रतिपादन डायबॅटोलॉजिस्ट व कार्डीयोलॉजिस्ट डॉ. अशपाक पटेल यांनी केले.

अल करम हॉस्पिटलच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ३ दिवस मोफत सर्वरोग आरोग्य शिबीर निदान व उपचार करुन रुग्णांना औषधे ही देण्यात आली. या शिबीरात प्रत्येक दिवशी ४० ते ५० रुग्णांनी याचा लाभ घेतला. रुगणांची तपासणी डॉ. अशपाक पटेल यांनी केली. रक्त व शुगर तपासणी महेश सानप, शिफा शेख, विशाल काळे, दानिश खान, मुस्कान शेख यांनी केले. यावेळी डॉ. जहीर मुजावर, डॉ. सय्यद खुसरो, डॉ. के. व्यंकटेश, शेरअली शेख आदी उपस्थित होते.

प्रास्तविकात हॉस्पिटलचे डॉ. जहीर मुजावर म्हणाले, आज विविध आजारांची उत्पत्ती ही हवा, पाणी, खाण्यातून होतांना दिसते.धकाधकीचे जीवन, वेळेवर न जेवणे, दुषित अन्न-पाणी, कोड्रिंक, फास्टफूड यामुळे बऱ्याच जणांना पोटाचे विकार होतात. यासाठी नियमित व्यायाम, संतुलीत आहार महत्वाचा आहे. प्रत्येकाने आपली प्रतिकार शक्ती वाढविण्याची गरज आहे. तसेच छोट-छोट्या व्याधींकडे दुर्लक्ष न करता नियमित तपासणी केल्यास भविष्यात उदभवणारे आजारांवर वेळीच निदान होऊ शकते. यासाठीच मोफत तपासणी शिबीराच्या माध्यमातून रुग्णांना दिलासा देण्याचे काम अल करम हॉस्पिटलच्यावतीने करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

शिबीरात नर्सिंग स्टाफ, टेक्निशियन, कर्मचारी यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन शेरअली शेख यांनी केले. एजाज तांबोली यांनी आभार मानले.

# भीमराव माझा झाला... पहिला बॅरिस्टर... बौद्ध संस्कार संघाची भीम पहाट रंगली




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने बौद्ध संस्कार संघाच्यावतीने आयोजित भीमपहाट गीतांच्या कार्यक्रमास प्रतिसाद मिळाला.

नगर – राखिले कुळाचे नाव तो भीमराव... खरंच सांगतो भीमराव माझा झाला पहिला बॅरिस्टर.... अंगार विषमतेचा तुडवून भीम गेला, न घडणारे आमचे जीवन घडवून भीम गेला.... अशा अनेकविध भीमगीतांनी सोमवारची पहाट भीममय झाली... ठिकाण होते... छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील चेतना लॉन्सचे व निमित्त होते... येथील बौद्ध संस्कार संघाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भीमपहाट संगीत मैफिलीचे. डॉ. आंबेडकरांच्या जीवन चरित्रावरील गाण्याचे सुरेख सादरीकरण उपस्थितांकडून टाळ्यांची दाद मिळवून गेले. बौद्ध संस्कार संघाद्वारे मागील १७ वर्षांपासून डॉ. आंबेडकर जयंतीच्या दिवशी पहाटे भीम गीतांची मैफल आयोजित केली जाते. यंदाच्या १८ व्या वर्षी ऑकेस्ट्रा संगीत सितारे परिवाराच्या कलावंतांनी अनेकविध भीमगीते सादर करून बहार आणली.

नव्हतं मिळत पोटाला, आता कमी नाही नोटाला, माझ्या भीमाची पुण्याई, अंगठी सोन्याची बोटाला.... लई चळ आलं माझ्या दुबळ्या पोरात, बाबासाहेबांमुळं तुझ्या न माझ्या घरात..... हक्कासाठी व न्यायासाठी लढले भीमराय... अशी भीमगीते विनय कसबेकर, गायक अतुल थोरात, आशा बडागळे, रंजना मेहेत्रे, शितल शिंदे, धनश्री पोखरणा यांनी सादर केली. तर लोकशाहीर शिवाजी शिंदे यांनी राखिले कुळाचे नाव तो भीमराव.. व खरंच सांगतो भीम माझा झाला पहिला बॅरिस्टर... असे दोन पोवाडे सादर केले. मूळच्या नगर जिल्ह्यातील जामगावच्या, पण मुंबईत वास्तव्यास असलेल्या व महाराष्ट्र शासनाचा समाजभूषण पुरस्कार मिळवलेल्या गायिका कल्पना सूर्यवंशी यांनी गाते भीमाची गाणी, गाते बुद्धाची गाणी... पहाट होताच बाई दीपू लागली प्रगतीची वाट... गाणे सादर केले. तर महाराष्टाचे गायक नरेश बडेकर यांनी.. भीम बनला सावली कोटी कोटीच्या माध्यावर... गाणे आणि नगरचे गायक राजेंद्र टाक यांनी... छाती ठेवून सांगू जगाला असा विद्वान होणार नाही.... गाणे सादर केले.

या भीम पहाट मैफिलीला अबालवृद्धांची गर्दी होती. टाळ्यांचा ठेका अनेकांनी धरला होता. या मैफिलीला ऑक्टोपॅडवर शशिकांत काकडे व अजित गुंदेचा यांनी ढोलकीवर साथसंगत केली. बौद्धाचार्य भाऊसाहेब देठे यांनी प्रास्ताविक केले. प्रतिभा देठे यांनी भीमवंदना सादर केली. यावेळी निवृत्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस. एम. सोनवणे, निवृत्त विक्रीकर अधिकारी एम. बी. साळवे, प्रा. दिलीप गायकवाड, प्रा. विश्वासराव कांबळे, गिरीश गायकवाड, श्रीराम जोशी, बालकुणाल अहिरे, डॉ. रमेश भिंगारदिवे, शांतीनाथ धनवे, मिलिंद जाधव, अरविंद जाधव, प्रा. दिलीप गायकवाड, किरण साळवे, पांडुरंग गायसमुद्रे, गजानन गायकवाड डॉ. प्रसाद सायगावकर, मिलिंद जाधव, बाळासाहेब धनवे, प्रा. डॉ. रवींद्र गायकवाड, कल्पनाताई कांबळे, ॲड. अरुंधती शिंदे आदींसह आंबेडकर प्रेमी उपस्थित होते. डॉ. पाचारणे व डॉ. प्राजक्ता सावेडकर यांनी सूत्रसंचालन केले.




# 'घिबली'चा प्रताप, स्वामी समर्थांऐवजी साईबाबांचा फोटो

**गे**ल्या काही दिवसांपासून 'सोशल मीडिया'वर 'घिबली इमेजेस'ने धुमाकूळ घातला आहे. 'घिबली इमेज' हे 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' असणारे तंत्रज्ञान असून या माध्यमातून चॅटजीपीटीवर स्वत:च्या ॲनिमेटेड प्रतिमा तयार करता येतात. आतापर्यंत कोट्यवधी यूजर्सनी 'घिबली इमेजेस'चा वापर करून आपल्या प्रतिमा तयार केल्या आहेत. भारतासह जगभरातून याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याने 'ओपन एआय'चे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स असणारे हे टूल बंद पडले होते. 'घिबली इमेज' तयार करून घेण्यासाठी एकाच वेळी लाखो यूजर्स 'चॅटजीपीटी'चा वापर करत असल्याने 'ओपन एआय'च्या सर्व्हरवर प्रचंड दबाव पडला. त्यामुळे घिबली इमेज तयार करताना अनेक चुकाही होत आहेत.

यापैकी काही फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. एका फोटोत महिलेने नवरा आणि दोन लहान मुलींसह 'घिबली'वर फोटो अपलोड केला होता; मात्र त्याची ॲनिमेटेड इमेज तयार होताना फोटोत नवऱ्याऐवजी दुसराच लहान मुलगा दिसत आहे. दुसऱ्या एका फोटोत एका जोडप्याने गुढीपाडव्याचा फोटो टाकला. गुढीसह नवरा-बायकोचा फोटो अपलोड करण्यात आला. मात्र प्रत्यक्ष 'घिबली इमेज' तयार होताना गुढीच्या ऐवजी एक पाठमोरी बाई दिसली. या सगळ्यावर कळस म्हणजे 'एआय टूल'ला अक्कलकोटचे स्वामी समर्थ आणि साईबाबांमध्ये फरक ओळखता आलेला नाही.

**डोक्यावर हात मारून घेण्याची वेळ**

एका यूजरने स्वामी समर्थांच्या प्रकटदिनी त्यांच्या तसबिरीसोबत फोटो काढला होता. या फोटोची 'घिबली इमेज' तयार करण्यासाठी यूजरने तो 'चॅटजीपीटी'वर अपलोड केला. मात्र प्रत्यक्षात इमेज आली तेव्हा डोक्यावर हात मारून घेण्याची पाळी आली. कारण या इमेजमध्ये स्वामी समर्थांऐवजी साईबाबा दिसत होते.

**सर्व्हरवर प्रचंड ताण**

'चॅटजीपीटी' मध्ये 'घिबली इमेज'च्या फ्री व्हर्जनवर सुरुवातीला कितीही फोटो तयार करता येत होते. मात्र सर्व्हरवरील ताण वाढल्यामुळे 'चॅटजीपीटी'ने फ्री व्हर्जन यूजर्सना एका दिवसात केवळ तीन इमेज तयार करून देण्याचे ठरवले. या सगळ्यामुळे 'ओपन एआय'चे सीईओ सॅम अल्टमन यांना ट्वीट करण्याची वेळ आली होती. त्यांनी यूजर्सना 'घिबली इमेज' तयार करण्यापासून ब्रेक घेण्याचे आवाहन केले होते. 'आमच्या टीमला झोपेची गरज आहे.

# हजारो कोटींची मालमत्ता, तरी विकतो भाजी

कॅलिडोस्कोप



**ना**वाची सुरुवात 'युवराज' आणि शेवट 'शिंदे' या आडनावाने होत असलेल्या एका व्यक्तीची लक्झरी लाइफस्टाइल अतिशय वेगळी आहे. त्याच्या खांद्यावर राजघराण्याचा वारसा आहे. राहण्यासाठी ४० हजार कोटी रुपयांचा 'जय विलास पॅलेस' आहे. तिजोरीत अब्जावधींची संपत्ती आहेत. थोडक्यात या राजपुत्राकडे वैभवाची कमतरता नाही; परंतु ग्वाल्हेर राजघराण्यातील या राजपुत्राने वडिलोपार्जित संपत्ती आणि प्रसिद्धी नव्हे तर मनाला भावणारे काम निवडले आणि यातूनच तो स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. कोट्यवधींची संपत्ती असूनही युवराज महाआर्यमान शिंदे भाजीपाला विक्री कंपनी चालवत आहेत.

युवराज राजघराण्याच्या वैभवाने समृद्ध आहे. अफाट संपत्तीमुळे उत्पन्नाची काळजी नाही. परंतु शिंदे घराण्यातील राजकुमारची विचारसरणी वेगळी आहे. वडील ज्योतिरादित्य शिंदे यांच्या राजकारण आणि राजघराण्यातील वारसा सोडून त्यांनी चक्क फळे आणि भाज्या विकण्यास सुरुवात केली. राजकुमार राजवाड्यातील भाज्या विकत असल्याने लोक थट्टा करत होते. पण त्याला न जुमानता महाआर्यमनने स्वतःहून काहीतरी करण्याचा निर्धार केला.

**युवराज भाजी विकतो**

डून स्कूलमध्ये शिकत असतानाच नाव स्वतः कमवेल असे महाआर्यमनने ठरवले होते. मग एका मित्रासवे २०२१ मध्य त्याने 'मायमंडी' नावाचा स्टार्टअप सुरू केला. महाआर्यमन मायमंडीचा सह-संस्थापक आहे. सध्या तो व्यवसायाच्या कल्पना पुढे नेण्यात व्यस्त आहे. सुरुवातीला तो स्वतः सकाळी लवकर उठून बाजारात जाऊन ताजी फळे आणि भाज्या खरेदी करायचा आणि ॲपद्वारे लोकांपर्यंत पोहोचवायचा.

**परदेशी शिक्षण**

डून स्कूलमधून सुरुवातीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने गेल विद्यापीठातून पदवी प्राप्त केली. बोस्टन कन्सल्टिंग ग्रुप आणि सॉफ्टबँक सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये काम केल्यानंतर त्याने आता स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. त्याचे स्टार्टअप मोठ्या प्रमाणात भाज्या खरेदी करते आणि लोकांपर्यंत पोहोचवते. कंपनी समुदायाला ताज्या भाज्या आणि फळांसाठी पुश कार्ट पुरवते. आज अनेक शेतकरी त्यांच्या स्टार्टअपशी जोडलेले आहेत. महाआर्यमन म्हणतो, की तो सध्या आठ कोटी रुपयांची गुंतवणूक उभारण्याच्या योजनेवर काम करत आहे.

# विवेकबुद्धीचे तीन तेरा



**या** जगात कोण काय मानत असेल याचा नेम नाही. श्रद्धा आणि अंधश्रद्धा पाळणारे बरेचजण असतात. काही गोष्टींचा तर्कही लावता येत नाही. तर अशीच एक अतर्क्य बाब म्हणजे १३ हा आकडा. जगभरात अनेकजण १३ या आकड्याला अशुभ मानतात. अर्थात या आकड्याबद्दल असणाऱ्या भीतीला शास्त्रीय भाषेत 'ट्रिस्काइडेकाफोबिया' किंव'थर्टीन डिजिट फोबिया' असे म्हणतात. अनेकजण १३ या आकड्याचा उच्चारही करत नाहीत. पाश्चिमात्य देशांमध्ये १३ या आकड्याबाबत बरीच अंधश्रद्धा आहे. म्हणूनच काही हॉटेल्समध्ये खोलीला १३ हा क्रमांक दिला जात नाही तर बरेच लोक १३ क्रमांकाच्या खोलीत रहायला नकार देतात. भारतातही अनेकांना १३ हा आकडा अशुभ वाटतो. गंमत म्हणजे चंडीगढमध्ये १३ क्रमांकाचा सेक्टरच नाही. चंडीगढ हे सुनियोजित शहर आहे. या शहराची रचना परदेशी आर्किटेक्टने केली होती, मात्र १३ या आकड्याची भीती वाटत असल्यामुळे त्याने चंडीगढमध्ये १३ क्रमांकाचा सेक्टरच ठेवला नाही!

# १२३ वर्षांची प्रकाशमान सेवा

**बा**जारातून स्वस्त बल्ब विकत घेतला तर त्याची गॅरंटी मिळत नाही. 'चले तो शाम तक, नही तो चाँद तक...' असे गमतीने दुकानदारही सांगतो. दुसरीकडे महागडा बल्ब आणला तर त्याची एक वा जास्तीत जास्त दोन वर्षांची हमी असते. पण एक बल्ब १२३ वर्षे सतत जळू शकतो असे सांगितले तर कदाचित विश्वास बसणार नाही. मात्र ही बातमी खरी आहे.

जगात असा एक बल्ब असून तो १९०१ पासून अव्याहत जळत आहे. 'लिव्हरमोर सेंटेनियल लाइट बल्ब' नामक हा बल्ब कॅलिफोर्नियातील लिव्हरमोर शहरात असणाऱ्या फायर स्टेशन क्रमांक सहा मध्ये बसवण्यात आला होता. हे स्टेशन शेल्बी इलेक्ट्रॉनिक कंपनीने १९०१ मध्ये बांधले होते आणि तेव्हापासून तेथे बल्ब जळत आहे.



**वंडर बल्ब**

इलेक्ट्रिक बल्ब कधी निकामी होईल याची शाश्वती नसते. दुकानातून कोणताही इलेक्ट्रिक बल्ब खरेदी केल्यावर कंपन्या केवळ एक वा दोन वर्षांची हमी देतात. मात्र वर उल्लेख केलेला 'वंडर बल्ब' अनोखा आहे.

**जागतिक विक्रम**

इतका प्रदीर्घ काळ अव्याहत जळत असल्यामुळे त्याच्या नावे जागतिक विक्रमही नोंदवला गेला आहे. अलिकडेच त्याला 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये स्थान देण्यात आले आहे. पूर्वी हा बल्ब ६० वॅटचा होता. मात्र आता तो केवळ ४ वॅटचा प्रकाश देऊ शकतो.



# ताजमहाल रात्री अंधारात का?

**ज**गातील सात आश्चर्यांपैकी एक असणारा ताजमहाल मोगल सम्राट शाहजहानने पत्नी मुमताज महलच्या स्मरणार्थ बांधला. मात्र या ताजमहाल परिसरात रात्रीच्या वेळी दिवे लावले जात नाहीत. तिथे अंधार असतो. यामागील कारण क्वचितच कोणाला माहिती असेल. ताजमहाल हे प्रेमाचे प्रतीक मानले जाते. वर्षभरात इथे लाखो पर्यटक येतात. यमुना किनारी ही सुंदर वास्तू सगळ्यांना आकर्षित करते. मोगल सम्राट शाहजहान यांनी ही वास्तू बांधली. आपल्या १४ व्या बाळाला जन्म देताना मुमताज यांच्या मृत्यू झाला. त्या वेळी १६३२ मध्ये ताजमहाल बांधण्यास सुरवात केली. ही अद्भुत वास्तू बांधण्यासाठी २०,००० कारागीर, शिल्पकार तब्बल २२ वर्ष मेहनत करत होते.

**देशभरातील वस्तू**

ताजमहलसाठी राजस्थानमधून पांढरे संगमरवर, दक्षिण भारतातून जाड दगड तर तुर्की, अफगाणिस्तान आणि चीनमधून महागडे रत्न मागविण्यात आले होते. या महालामध्ये २२ खोल्या आहेत. पुढे त्या बंद करण्यात आल्या. या खोल्या १९३४ मध्ये निरीक्षणच्या वेळी उघडल्या गेल्या होत्या. तेव्हापासून आजपर्यंत त्या उघडल्या गेल्या नाहीत.

**९१ वर्षे खोल्या बंद**

२०२२ मध्ये या खोल्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र कोर्टाने ती फेटाळली. ताजमहाल पर्यटकांसाठी सकाळी सहा वाजता उघडतो आणि संध्याकाळी ६.३० वाजता बंद होतो.

**सौंदर्य जपण्यासाठी लाईट बंद**

ताजमहाल परिसरात लाइट्स लावल्यास किडे आकर्षित होतील आणि संगमरवरी दगडाच्या भिंतीला चिकटतील. यामुळे ताजमहालचे सौंदर्य खराब होईल. वायू प्रदूषणामुळे टाइल्स खराब होतील. असेही १९९७ पासून सुरक्षेच्या कारणास्तव रात्रीच्या वेळी येथे दिवे वापरण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने या संदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. ताजमहालची स्वच्छता आणि सुरक्षितता लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय घेतला आहे.

**दर शुक्रवारी बंद**

ताजमहाल दर शुक्रवारी बंद राहतो कारण तो दिवस प्रार्थनेसाठी राखीव असतो. पर्यटकांना विशेषतः पौर्णिमेच्या रात्री प्रवेश दिला जातो. भारतीय नागरिकांसाठी प्रवेश शुल्क ५० रुपये आहे तर परदेशी पर्यटकांसाठी ते १,१०० आहे. ताजमहालचा मुख्य मकबरा पूर्णपणे भूमिगत आहे. यमुना नदीच्या काठावर असणाऱ्या या इमारतीचा पाया मजबूत करण्यासाठी मोगलांनी एका विशेष स्थापत्य शैलीचा वापर केला. ताजमहाल दिवसा पांढरा, संध्याकाळी लाल आणि चांदण्या रात्री निळ्या रंगात चमकतो. मोगल राजवटीच्या समाप्तीनंतर ब्रिटिश काळात ताजमहालवर हल्ला झाला आणि त्यातील मौल्यवान रत्ने लुटण्यात आली. हा इतिहास आज अनेकांना माहिती नाही.




# ...त्यांच्यासाठी वेगळी लेन

**स**ध्याच्या काळात स्मार्टफोनने माणसांचा ताबा घेतला आहे. रस्त्यावर चालताना चॅट करणारे, सेल्फी घेणारे, गेम खेळणारे अनेकजण दिसतात. दुचाकीस्वार गाडी चालवत असताना कानाला फोन लावून बोलत असतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता अनेकपटींनी वाढली आहे. अपघात झाला तरी हरकत नाही पण स्मार्टफोन सोडायचा नाही अशीच जणू लोकांची मानसिकता झाली आहे. मात्र स्मार्टफोनचा वाढता वापर बघता चीनमधल्या बऱ्याच रस्त्यांवर मोबाईल वापरणाऱ्यांसाठी वेगळ्या लेन्स तयार करण्यात आल्या आहेत. मोबाईल वापरकर्त्यांनाच या लेनमध्येच प्रवेश दिला जातो. याच धर्तीवर इंग्लंडमधल्या मॅंचेस्टरमध्येही मोबाइल लेन तयार करण्यात आली आहे.

'मोबाइल फोन लेन' याच नावाने ती ओळखली जाते. युरोपमध्ये पहिल्यांदाच हा प्रयोग करण्यात आला. बँकॉकच्या एका रस्त्यावरही अशाच प्रकारे मोबाइल लेन तयार करण्यात आली आहे. स्मार्टफोन हातात घेऊन चालण्याचे धोके लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सिंगापूरमध्ये रस्त्यावर पिवळ्या पट्ट्या आखण्यात आल्या आहेत. त्यावर 'नो मोबाइल फोन' असे लिहिण्यात आले आहे. दक्षिण कोरियात रस्त्यावर एलईडी लाईट्स बसवण्यात आले आहेत. यामुळे रस्ता ओलांडताना लोक सजग असतात. स्मार्टफोनचा वाढता वापर बघता आता मोबाइल फोन वापरणाऱ्यांसाठी खास लेनची सोय करायची वेळ आली आहे, असेच म्हणावे लागेल. स्मार्टफोनचे हे व्यसन आपल्याला कुठे घेऊन जाणार हे कळायला मार्ग नाही. हा विळखा सैल करण्याची गरज आहे, हे आतातरी समजून घ्यायला हवे.

# स्टेशनवर जेवणाची पंगत

**स**र्वात जलद आणि स्वस्त पर्याय म्हणून भारतातील लाखो प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. प्रवाशांसाठी रेल्वेतर्फे अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यात प्रवाशांना जेवणही दिले जाते. मात्र प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रेल्वेत नाही तर चक्क रेल्वे स्थानकावर जेवण दिले जाणारे एक ठिकाण आहे. एका रेल्वेच्या मार्गात येणाऱ्या



सहा स्टेशनवर पंगत असते. स्थानकांवर रेल्वे थांबल्यावर प्रवासी उतरतात आणि पंगतीमध्ये जेवणाचा अन्नाचा घेतात.


या ट्रेनचे नाव आहे अमृतसर-नांदेड सचखंड एक्सप्रेस. मागील २९ वर्षांपासून ही ट्रेन सुरू असून त्यातील सर्व प्रवाशांना मोफत जेवण दिले जाते. या ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बरोबर अन्नपदार्थ घेऊन जावे लागत नाही. मात्र प्रवास करणारे प्रवासी ताट आणि वाटी बरोबर ठेवतात. या ट्रेनमध्ये एक पॅंट्री कार असली तरी तिथे अन्न शिजवले जात नाही.


**सर्व प्रवाशांना जेवण**

१९९५ मध्ये सुरु झालेल्या अमृतसर-नांदेड सचखंड एक्सप्रेसचा संपूर्ण प्रवास २०८१ किलोमीटरचा आहे. ती ३९ स्थानकांवर थांबते. धार्मिक पर्यटनासाठी ही साप्ताहिक ट्रेन लोकप्रिय आहे. तीमधून प्रवास करणारे सर्व प्रवासी स्वतःची भांडी घेऊन येतात. जनरल ते एसी कोचपासूनचे सर्व प्रवासी एकत्र स्टेशनवर उतरून लंगरचा लाभ घेतात. नांदेड, मनमाड, भोपाल, ग्वाल्हेर, दिल्ली आणि भुसावळ रेल्वे स्थानकांवर सर्व प्रवाशांना मोफत जेवण दिले जाते. ट्रेन थांबल्यावर सर्व प्रवासी उतरतात आणि जेवण करतात.

**दररोज बदलतो मेनू**

या ट्रेनमधील लंगर मेनू दररोज बदलतो. बरेचदा कढी-भात, छोले-भात, डाळ, खिचडी, बटाटा-फुलकोबी करी, सफरचंद करी, हिरव्या भाज्या, हंगामी भाज्या असा मेनू असतो. मागील २९ वर्षांत असा एकही दिवस गेला नाही, जेव्हा प्रवाशांना जेवण दिले गेले नाही. कोणत्याही कारणास्तव ट्रेन उशिरा आली तर सेवादार ट्रेनची वाट पाहतात. दररोज २००० हून अधिक प्रवासी येथे मोफत जेवण करतात. गुरुद्वाराला मिळालेल्या देणग्यातून जेवणाचा खर्च भागवला जातो आणि गुरुद्वाऱ्यात सेवा देणारे सेवेकच प्रवाशांना जेवण वाढतात.





# रक्ताचे विभिन्न रंग

**र**क्त म्हटले की ते लाल रंगाचेच असते. पण जगातल्या काही सजीवांच्या रक्ताचा रंग लाल नाही तर निळा, हिरवा, पिवळा आहे. ऑक्टोपस या आठ पायांच्या सागरी जीवाचे रक्त निळ्या रंगाचे असते. शरीरात तांब्याचे प्रमाण बरेच जास्त असल्यामुळे त्याच्या रक्ताचा रंग निळा असतो. सी क्युकंबर नावाचा एक सजीव आहे. काकडीच्या आकाराचा हा जीव समुद्रात आढळतो. या सजीवाचा रंग हिरवा असला तरी त्याचे रक्त मात्र पिवळ्या रंगाचे असते. या मागचे कारण मात्र अजूनही उलगडलेले नाही.

पीनट वॉर्म नावाचा एक कीटक आहे. या किड्याचे रक्त जांभळट रंगाचे असते. पीनट वॉर्मच्या शरीरात हिमोरिथरीन नामक घटक असतो. ऑक्सिजनशी संपर्क आल्यानंतर या घटकाचा रंग जांभळट होतो. यामुळे पीनट वॉर्मच्या रक्ताचा रंग जांभळा असतो.

न्यू गिनी नामक सरड्याचे रक्त हिरव्या रंगाचे असते. त्याचे स्नायू आणि जीभेचा रंगही हिरवाच असतो.

क्रोकोडाइल आईसफिश नामक मासा मासा मगरीसारखा दिसतो. विशेष म्हणजे या माशाचे रक्त रंगहीन असते. तसंच ते पारदर्शकही असते. हिमोग्लोबिन आणि हेमोसाइनिन नामक घटक नसल्यामुळे ते रंगहीन असतं.

# अजबगजब गुहा

**आ**जवर तुम्ही विविध गूढ गुहांबद्दल ऐकले असेल. पण व्हिएतनाममधली एक गुहा अनेक अर्थांनी अनोखी आहे. ही जगातली सर्वात मोठी गुहा असल्याचे म्हटले जाते. या गुहेत वेगळेच जग वसले आहे. गुहेतून चित्रविचित्र भीतीदायक आवाज येत असतात. हे आवाज ऐकून कोणाचाही थरकाप उडाल्याशिवाय रहाणार नाही. 'हँग सोंग डूंग' नावाची ही गुहा नऊ किलोमीटर लांब, २०० मीटर रुंद आणि १५० मीटर उंच आहे. या गुहेत झाडे, झुडपे, घनदाट जंगले, नदी आदी बरेच काही आहे. लाखो वर्षांपूर्वीची ही गुहा २०१३ मध्ये पर्यटकांसाठी खुली करण्यात आली. ही गुहा अत्यंत धोकादायक असल्यामुळे दर वर्षी फक्त २५० ते ३०० लोकांनाच तिथे जाण्याची परवानगी मिळते. १९९१ मध्ये हो खानह नामक स्थानिकाने या गुहेचा शोध लावला. पण आतून येणाऱ्या भयंकर आवाजांमुळे कोणीही इथे येण्याची हिंमत करू शकले नाही. २००९ मध्ये गुहा जगाच्या नकाशावर आली. २०१० मध्ये शास्त्रज्ञांनी २०० मीटर उंच भिंत ओलांडून गुहेत प्रवेश करण्याचा रस्ता शोधला. या गुहेत जाण्यासाठी भरपूर खर्च करावा लागतो. मात्र इथला अनुभव भन्नाट असतो. या गुहेत प्रवेश करण्याआधी पर्यटकांना प्रशिक्षण घ्यावे लागते. तब्बल सहा महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणानंतर रहस्यमयी गुहेत जाण्याची परवानगी मिळते.



# आवाजाचे जग.. जगाचा आवाज

आज १६ एप्रिल जागतिक आवाज दिवस म्हणून जगामध्ये पाळला जातो. वेगवेगळे दिवस आजकाल ज्या पद्धतीने पाळले जातात ते असं वाटतं की जणू काही कोणाचे तरी शेवटचे दिवस घातले जातात कि काय? कारण त्या दिवसानंतर त्या गोष्टीचं महत्त्व कोणालाच कायम अंमलबजावणी करावसं वाटत नाही.. किंवा त्यावर काही चिंतन मनन, ग्रहण करावसं वाटत नाही. या पृथ्वीवर सगळ्या गोष्टींचं अस्तित्व खरं म्हणजे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आवाजाशीच निगडित आहे.. किंबहुना आवाज हेच जिवंतपणाचे लक्षण आहे, आपण एखादा मनुष्य संपला किंवा त्याला कपट कारस्थान करून संपवला तर मराठीत म्हण वापरतो की त्याचा आवाजच बंद केला...किंवा एखादा व्यक्ती जास्त त्रास देत असेल तर शब्द वापरतो की तो जरा जास्त आवाज करत होता, मग मी त्याच्या कानाखाली आवाज काढला... आपल्या आपल्या जगभर प्रसिद्ध असलेल्या आदर्श लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या वेळेस सुद्धा घोषणा दिल्या जातात... छोटी छोटी माणसं सुद्धा मोठ्या मोठ्या स्पीकरवरून घोषणा देतात... आवाज कोणाचा...

आपल्याला सर्वात जास्त सुख देऊन जाणारं साधन म्हणजे संगीत... जे अर्थपूर्ण, शांत सुंदर आल्हाददायक असेल त्याला संगीत म्हणतात. आजच्या संगीताला डोकेदुखी धांगडधिंगा म्हणतात.. रस्त्यावर भाजी विक्री विकणाऱ्या छोट्या माणसापासून ते दिल्लीला जाऊन आमदार, खासदार विकत घेणाऱ्या मोठ मोठ्या पुढाऱ्यांपर्यंत त्याने दिलेला अर्थपूर्ण आवाज त्याचा धंदा करून जातो... ज्याचा आवाज जेवढा मोठा तेवढा धंदा मोठा...म्हणून आजकाल भंगार विकत घेणारा माणूस सुद्धा गल्लीबोळातून फिरताना हातगाडीवर छोटा रेकॉर्डिंग केलेला स्पीकर लावतो.. आणि आवाजाच्या माध्यमातूनच आपलं अस्तित्व दाखवतो..घरात सुद्धा वर्चस्व कुणाचं आहे? हे सुद्धा आवाजावरूनच ठरतं.. सासूचं आहे? की सुनेच आहे? सासऱ्याचं वर्चस्व आहे की मुलाचं आहे..?

एकंदर काय तर आवाज हे तुमचं अस्तित्व तुमचा जिवंतपणा आणि तुमचं कर्तृत्व आणि संवाद, दैनंदिन व्यवहार व्यक्त आणि अव्यक्त विचार, आचार प्रचार या सगळ्या गोष्टींसाठी एक प्रभावी माध्यम असल्यामुळे वास्तविक आवाज हाच या दुनियेचा आत्मा आहे असं म्हणायला हरकत नाही.. या आवाजाबाबत थोडा विचार केला तर आपल्याला दिसून येईल की आवाजाचा वेग ३४३ मीटर प्रति सेकंद इतका आहे.. तो प्रकाशाच्या वेगापेक्षा कमी आहे.. म्हणून तर आपल्याला दिवाळीत दूरवर आकाशात पहिल्यांदा रॉकेट फुटल्याचा फक्त प्रकाश दिसतो आणि मग एक-दोन सेकंदा नंतर आवाज ऐकू येतो.. सध्या पृथ्वीला ज्या अनेक प्रदूषणांनी ग्रासलेलं आहे त्यापैकी सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे ध्वनी प्रदूषण हे आवाजाचं आधुनिक माणसानं आदिमानवाला देखील लाजवेल अशा पद्धतीने विकृत केलेलं माध्यम...असे ध्वनीप्रदूषण करण्यामध्ये भारतासारखा अग्रेसर देश पृथ्वीच्या पाठीवर दुसरा कदाचित नसावा..

ते फक्त कागदावर बंदी असलेले कर्णकर्कश्य हॉर्न... तशीच कडक बंदी असलेल्या डीजे सिस्टीम लावून बहिऱ्या प्रशासनाच्या आणि हतबल कायद्याच्या कानाखाली आवाज काढत रोज निघत असलेल्या अंदाधुंद मिरवणुकी... धार्मिक स्थळांवरचे जणुकाही त्यांच्या दोन्ही




कानांनी ठार बहिऱ्या असलेल्या देवांपर्यंत ऐकू जावेत यासाठी लावलेले कर्णकर्कश्य भोंगे..चौका चौकात थोर, विचारवंत महापुरुषांच्या पुतळ्यांसमोर त्यांना श्रद्धांजली म्हणून गुटखे खाऊन माकडासारखे नाचत पप्पी दे.. पप्पी दे.. असे झोपडपट्टी छाप आवाजात लावलेले हिडिस गाणे.. हा प्रत्येक महापुरुष जणू काही रात्री बारा वाजताच जन्मला असल्यासारखे रात्री बारा वाजता उडवले जाणारे फटाके... या सगळ्या गोष्टी माणूस हा अजून नुसता आदिमानवच नाही तर जनावर झाला आहे याची साक्ष देतात..

जास्तीत जास्त फक्त ७५ डेसिबल इतका आवाज मानवी कानांना आणि मेंदूला सहन होऊ शकतो.. परंतु दिवाळीत वाजवले जाणारे फटाके २०० डेसिबलपर्यंत उत्पादित कसे केले जातात? हे एक रहस्य आहे. रस्त्यावर वाजवणारे मालट्रकचे हॉर्न हे १५० डेसिबलपर्यंत जातात.. डीजेचा आवाज २०० डेसिबलपर्यंत जाऊन मेंदूच्या शिरा तुटतात, कानाचे पडदे फाटतात, जागेवर मृत्यू होतो याचे अनेक व्हिडिओ शेअर होताना ही अनेक बथ्थड मेंदूचे आदिमानव याची दखलही घेत नाहीत..

आज आवाजाला झालेला कॅन्सर म्हणजे डीजे... ध्वनीचं जेव्हा रूपांतर रेडिओ लहरीमध्ये केलं जातं, तेव्हा आपल्याला आठवत असेल की चंद्रावरून आर्मस्ट्राँग आणि ऑलड्रिंन हे देखील अमेरिकन राष्ट्राध्यक्षांशी प्रत्यक्ष बोलले होते.. चंद्र आपल्यापासून चार लाख किलोमीटर दूर आहे तरी देखील ते स्पष्टपणे चंद्रावरून बोलू शकले होते ते केवळ आवाजाच्या रेडिओ लहरी माध्यमातून. या रेडिओ लहरी एका क्षणात लाखो किलोमीटर अंतर पार करू शकतात इतक्या प्रभावशाली असतात, म्हणून तर जगभरात आवाजाच्याबाबत रेडिओसारखं आजही अभावी माध्यम दुसऱ्या कुठल्याही नाही..

आईन्स्टाईनने सिद्ध केलेल्या प्रयोगानुसार या पृथ्वीच्या अंतरीक्षात, ब्रह्मांडात आपण उच्चारलेला प्रत्येक शब्द हा अमर स्वरूपामध्ये आवाजाच्या रूपांमध्ये जिवंतच राहतो, तो कधीही नष्ट होत नाही, म्हणून पश्चिम जर्मनीमध्ये एक प्रयोग चालू आहे की अंतरिक्षमध्ये आजही जिवंत असलेले उच्चारलेले असे थोर ऐतिहासिक महापुरुषांचे संभाषण देखील मशीनमध्ये ग्रहण करण्याचे प्रयोग चालू आहेत याचा अर्थ आपल्याला भविष्यात कदाचित ज्ञानेश्वर महाराजांची अमृत वाणी.. तुकाराम महाराज प्रत्यक्ष काय बोलले? शिवाजी महाराजांनी दरबारामध्ये प्रत्यक्ष काय सांगितले हे देखील ऐकण्याची संधी मिळेल अशी आशा आहे..

ध्वनीचे तीन प्रकार असतात एक म्हणजे सामान्य श्रवणीय ध्वनी, दुसरा इन्फ्रोसोनिक साउंड जो वीस हर्ड्स पेक्षा कमी असतो आणि तिसरा म्हणजे अल्ट्रासॉनिक ध्वनी जो वीस हट्र्स पेक्षा जास्त असतो. अगदी छोटासा सजीव म्हणून मुंग्या देखील एकमेकांशी संभाषण करतात.. परंतु ते आपल्याला ऐकू येत नाही.. एक अवाढव्य सजीव म्हणून हत्ती देखील एकमेकांशी संभाषण करतात परंतु ते आपल्याला ऐकू येत नाही .. कारण तो सुमारे २०० हट्र्स आणि कंपन्याने एकमेकांशी शेकडो किलोमीटर पर्यंत संवाद साधू शकतो आणि तो आवाज मानवी कानांना अजिबात ऐकू येऊ शकत नाही..

आपल्याला तर कधी कधी आपलाच माणूस काय बोलतोय ते सुद्धा ऐकू येत नाही. आपण एवढे मतलबी बहिरे आहोत की समोरचा काय सांगतो ते देखील आपल्याला फक्त मतलब असेल तर मतलबापूरतेच आणि हवे तेवढेच ऐकू येते.. बाकीच्या वेळेस आपण मतलबी बहिरे होतो.. अशी अशी ही आवाजाची किमया...जसं एखाद्या व्यक्तीचा दिसणं वागणं, बोलणं त्याच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळंच रूप प्राप्त करून देते.. तसंच आवाजाच्या बाबत आहे आवाज हे व्यक्तिमत्त्वाचं एक प्रभावी साधन आहे..

लता मंगेशकर, अमीन सायानी, अमिताभ बच्चन अशी त्याची असंख्य उदाहरणं सांगता येतील, ज्यांचं भौतिकदृष्ट्या किंवा शारीरिक दृष्ट्या व्यक्तिमत्व अजिबात प्रभावी नव्हतं तरीदेखील केवळ आवाजाच्या माध्यमातून त्यांनी जग जिंकलं.. मग ते अभिनयाचे क्षेत्र असो, गायनाचे क्षेत्र असो, राजकारणातलं असो किंवा इतर कलांच्या कुठल्याही माध्यमातून असो.. आवाजाच्या माध्यमातूनच आपण एकमेकांपासून व्यक्त होतो. भावभावनांचा कल्लोळ कधी हळुवार कधी प्रेमाचा कधी आपुलकीचा कधी दुःखाचा तर कधी कधी प्रचंड संतापाचा स्वर.. आपल्या मधलं नातं कुठल्या पातळीवर आहे हे सांगून जातो..

आजच्या आधुनिक युगामध्ये अनेक लॅपटॉप मोबाईल घराची तिजोरीची इलेक्ट्रॉनिक्स कुलपे, घरातले सेन्सर लाईटची बटने, लेक्सासारखी साधने, कारचे इग्निशन बटनपासून ते बँकेतल्या लॉकरपर्यंत आवाजाच्या माध्यमातून उघडले जाऊ शकतात. कारण एकाच आवाज दुसऱ्याशी मिळता जुळता असला तरी बोटांच्या ठशाप्रमाणे प्रत्येकाचा स्वर त्याची फ्रिक्वेन्सी त्याचं स्वरयंत्र हे परमेश्वराने अतिशय वेगळे वेगळे बनवलेले आहे.. आता अत्याधुनिक एआय च्या माध्यमातून या सगळ्यांवर कुरघोडी झाली असली तरी ही प्रगती चांगलं देखील आहे आणि अतिशय वाईट देखील आहे की आज कोणीही कोणाचाही आवाज काढू शकतो आणि कायमचा बंदही करू शकतो...

व्यक्त होण्यासाठी संवाद साधण्यासाठी नेहमी आवाजाचा वापर केला पाहिजे असं काही नाही कित्येक वेळेस तर मौन राहूनही आपल्याला काय म्हणायचं ते प्रभावीपणे म्हणता येतं वास्तविक तेच अधिक प्रभावीपणे म्हणता येतं म्हणून एक शायर म्हणतो की..

कौन कहता है आपके खामोशिया खामोश होती है जनाब...खामोशियों को अगर खामोशीयो से सुनो तो.. खामोशिया वो कह देती है.. जिनकी लब्जों को तलाश होती है...

**- सुहास मुळे, मोबा. ९८२३७२२२१२.**
आकाशवाणी दूरदर्शन संहिता लेखक,
संगीत समीक्षक अध्यक्ष, जागरूक नागरिक मंच.



शिर्डी नगरपंचायतीने महिला सफाई व स्वच्छता कर्मचाऱ्यांना कामावरून काढल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

## महिला सफाई व कर्मचाऱ्यांना कामावरून काढल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु

नगर - शिर्डी नगरपंचायतीने महिला सफाई व स्वच्छता कर्मचाऱ्यांना कामावरून अचानकपणे काढल्याने त्या महिलांना पुन्हा कामावर हजर करण्याच्या मागणीसाठी भारतीय दलित महासंघाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करताना सुनील उमाप, पावलास पवार, प्रेम गाडे, रमेश नवगिरे, बाळासाहेब नेटके, कविताताई नेटके, कर्मचारी सौ. संगीता आरने, नूतन रणदिवे, सुरेखा दिवेकर, हमिदा सय्यद, बेबी खैरे, निर्मला पाचोरे, अनिता कुसळकर, सरिता गुंजाळ आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, शिर्डी नगरपंचायतीमध्ये १० ते १५ वर्षांपासून कंत्राटी सफाई व स्वच्छता कामगार म्हणून काम करीत आहेत तरी सर्व कर्मचारी हे गरीब परिवारातील असून त्यांचा प्रपंच व परिवार याच कामावर अवलंबून आहे. सर्व कर्मचारी अनेक वर्षापासून संबंधित नगरपंचायतीमध्ये प्रामाणिकपणे स्वच्छतेचे व सफाईचे काम करीत आहे. अनेक वर्षापासून त्यांच्या कामापासून नगरपंचायतीचे प्रामाणिक सेवा करीत आहे. हे सर्व महिला कर्मचारी असून कामावरून अचानक कमी केल्यामुळे अन्याय व उपासमारीची वेळ आलेली आहे. या महिलांना पुन्हा कामावर हजर करून घ्यावे.

## उच्च शिक्षणासाठी परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा

नगर - अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या आणि अर्ध भटकंती जमाती, भूमिहीन शेतमजूर आणि पारंपरिक कारागीर श्रेणीतील कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून या योजनेचा पात्र लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार यांनी केले आहे.

योजनेच्या लाभासाठी विद्यार्थी भारताचा रहिवाशी असावा. विद्यार्थ्याचे वय ३५ वर्षापेक्षा अधिक नसावे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे. पदव्यूत्तर पदवी किंवा पदव्यूत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परीक्षेत व पीएचडी अभ्यासक्रमासाठी पदव्यूत्तर परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असावी.

अनुसूचित जातीच्या ११५, विमुक्त भटक्या आणि अर्ध भटकंती जमातीच्या ६ तर भूमि हीन शेतमजूर आणि पारंपरिक कारागीर श्रेणीतील कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील ४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेंतर्गत विद्यार्थ्याला विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षणाच्या फीसची पूर्ण रक्कम दिली जाते. आरोग्य विमा, व्हिसा शुल्क या बाबी परदेश शिष्यवृत्तीधारकांसाठी अनुज्ञेय असतील. विद्यार्थ्यास अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी १५ हजार ४०० यु.एस. डॉलर तर यु.के. साठी ९ हजार ९०० जी.बी. पौंड इतका वार्षिक निर्वाह भत्ता अदा करण्यात येतो. विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी १ हजार ५०० डॉलर तर यु.के. साठी १ हजार १०० पौंड इतकी रक्कम देण्यात येते. यामध्ये पुस्तके, अभ्यासदौरा व इतर खर्चाचा समावेश आहे. विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर येताना विमान प्रवासाचा खर्च अनुज्ञेय राहील. योजनेची माहिती तसेच अर्जाचा नमुना www.nosmsje.gov.in या केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी योगेश तनेजा, अवर सचिव, शास्त्रीभवन, डॉ. राजेंद्रप्रसाद मार्ग, नवीदिल्ली so-nos-msje@gov.in या ईमेल अथवा ०११-२३३८४०२३ या दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत दुपारी ३ ते ५ या वेळेत संपर्क साधता येईल.




अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी चारा वाटप करण्यात आले. (छाया - लहू दळवी)

## अरुण जगताप यांची प्रकृती सुधारण्यासाठी चारा वाटप

नगर - अरुण जगताप यांची प्रकृती लवकर सुधारण्यासाठी अरुणोदय गोशाळा येथे गोमातांसाठी चारा वाटप करण्यात येवून सामूहिक प्रार्थना करण्यात आली. यावेळी सुमतीलाल कोठारी, राजेंद्र शेटिया, पप्पू मुंदडा, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, चंद्रकांत औशीकर, किशोर डागा, गोविंद परमार, मनीष फुलडहाळे, भाऊ हुचे, विकी येनगुल, अतुल कावळे, बाळासाहेब डागवाले आदी उपस्थित होते.

यावेळी सुमतीलाल कोठारी म्हणाले, अरुणकाका हे गोप्रेमी आहेत. त्यांनी स्वतः या गोशाळेच्या उभारणीसाठी पुढाकार घेतला असून या ठिकाणी ५०० गोमातेचा सांभाळ केला जातो. आज त्यांच्या प्रकृतीसाठी गोसेवा आणि प्रार्थना केली. काकांनी समाजाप्रती केलेल्या कार्यामुळे त्याना दीर्घायुष्य लाभेल असे ते म्हणाले.

## माजी आमदार अरुण जगताप यांची प्रकृती सुधारण्यासाठी विजय हनुमान मंदिर येथे महाआरती व हनुमान चालीसा पाठ

नगर - माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत तातडीने सुधारणा व्हावी, यासाठी एकत्र येत विविध संघटनांच्या वतीने स्टेट बँक चौक येथील विजय हनुमान मंदिरात महाआरती व हनुमान चालीसा पाठ करण्यात आले. या भक्तिपूर्ण उपक्रमात परिसरातील नागरिकांसह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व मनपा कर्मचारी व ठेकेदार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात हनुमान चालीसा पठणाने झाली. शेकडो भक्तांनी एकत्र येत भक्तिभावाने ११ वेळा हनुमान चालीसा म्हणत भगवान हनुमान चरणी अरुणकाका यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली. त्यानंतर महाआरती करण्यात आली. यावेळी इंजि. सुरेश इथापे, शहर अभियंता मनोज पारखे, इंजि. श्रीकांत निंबाळकर, स्वाती जाधव, सोनू चौधरी, महादेव काकडे, किशोर कानडे, उदय अनभुले आदी उपस्थित होते.



माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी स्टेट बँक चौक येथील विजय हनुमान मंदिरात एकत्र येत विविध संघटनांच्या वतीने महाआरती व हनुमान चालीसा पाठ करताना भाविक. (छाया - लहू दळवी)

यावेळी इंजि. सुरेश इथापे यांनी सांगितले की, काका हे सर्वसामान्यांचे नेते आहेत. त्यांनी समाजाच्या प्रत्येक स्तरासाठी भरीव कार्य केले आहे. त्यांची प्रकृती लवकरात लवकर पूर्ववत व्हावी, हीच श्री हनुमंत चरणी आमची प्रार्थना आहे. महाआरतीनंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम धार्मिकतेसह सामाजिक भावनेचं उत्तम उदाहरण ठरला. एका लोकनेत्याच्या आरोग्यासाठी समाजातील विविध घटक एकत्र आले, ही एकतेची आणि माणुसकीची भावना आहे.

जगताप कुटुंबियांना धार्मिकतेचा वारसा लाभलेला आहे. त्यांच्या या कार्यामुळे परमेश्वर अरुणकाकांना शक्ती आणि ताकद देऊन नगरकरांची सेवा करण्यासाठी बरे करेल असे ते म्हणाले.

## अरुणकाकांसाठी श्री वैष्णवी माता मंदिरात महाआरती

नगर - माजी आ. अरुणकाका जगताप यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, यासाठी परिसरातील नागरिकांनी एकत्र येत देवीसमोर मनोभावे प्रार्थना केली. विनायकनगर येथील श्री वैष्णवी माता मंदिरात विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या भाविकतेने भरलेल्या सोहळ्यात सामूहिक महाआरती करून काकांच्या उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त करण्यात आल्या. वैष्णवी माते, अरुणकाकांना बरे कर अशा भक्तिपूर्ण भावनेतून त्यांच्या आरोग्याबद्दलची काळजी आणि आत्मियता ठळकपणे जाणवत होती. या कार्यक्रमाचे आयोजन स्थानीय नागरिक व मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले. यावेळी प्रशांत नन्नवरे, हर्षद वालेकर, धनंजय भोसले, चेतन अग्रवाल, आबा भोसले, नितीन खैरे, गुड्डू म्हस्के, मयूर म्हस्के, सुमित सुगंधी, वेदांत दुशिंग, प्रसाद वाघमारे, किशोर श्रीश्रीमाळ, शुभम वालेकर, अंकित मोरे, दर्शन भंडारी, मनोज भंडारी, अभिजित कुऱ्हाडे, ऋषिकेश काळे, निखिल हजारे, ऋषिकेश रासकर, प्रतीक क्षीरसागर, शिवम गावडे, पद्माकर खेत्रे, सचिन रासकर, गणेश मोरे व अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळाच्या सदस्य, युवक, लहान मुलेही उपस्थित होती.



अरुण जगताप यांच्या प्रकृतीसाठी श्री वैष्णवी माता मंदिरात महाआरती करण्यात आली. (छाया - लहू दळवी)

प्रशांत नन्नवरे यांनी सांगितले की, काका यांनी अनेक वर्षे या परिसरातील लोकांसाठी काम करत आहे. आज आम्ही त्यांचं आरोग्य पूर्ववत व्हावं यासाठी देवीच्या चरणी प्रार्थना केली आहे. काका यांनी नेहमीच श्री वैष्णवी माता मंदिर परिसराच्या विकासासाठी पुढाकार घेत असून नवरात्र उत्सवामध्ये महाप्रसादाचे आयोजन करत असतात. अरुणकाका धार्मिक कार्यक्रमासाठी नेहमीच अग्रेसर राहत असतात त्यांना श्री वैष्णवी माता नक्कीच या संकटातून बाहेर काढेल व समाजातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी ऊर्जा देईल असे ते म्हणाले.




अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी रिमांड होम येथील विद्यार्थ्यांकडून प्रार्थना करण्यात आली. (छाया - लहू दळवी)

## अरुण जगताप यांची प्रकृती सुधारण्यासाठी 'रिमांड होम' येथील विद्यार्थ्यांकडून प्रार्थना

नगर - माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी येथील रिमांड होममधील विद्यार्थ्यांनी सामूहिक प्रार्थना केली. या प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सर्वे सन्तु निरामयाः या भावनिक मंत्रोच्चाराने केली. शांत, सात्त्विक वातावरणात विद्यार्थ्यांनी मनोभावे प्रार्थना करत आपल्या शब्दांत अरुणकाकांच्या आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी चंद्रकांत औशीकर, प्रा.अरविंद शिंदे, ज्ञानेश्वर रासकर, किशोर डागा, डॉ. रोहित औशीकर, मनीष फुलडहाळे, राजू शेटिया आदीसह अधिकारी, शिक्षकवर्ग उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शुभेच्छा पत्रांमधूनही अरुणकाकांच्या कार्याबद्दल त्यांची श्रद्धा आणि आपुलकी दिसून आली.

कार्यक्रमाचे आयोजन चंद्रकांत औशीकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी त्यांनी सांगितले की, काका हे समाजातील दुर्बल घटकांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या प्रकृतीसाठी या विद्यार्थ्यांकडून मिळालेली सदिच्छा ही त्यांच्याच कार्याचे फलित आहे. प्रार्थनेनंतर विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक एकोपा, माणुसकीची भावना आणि सामूहिक प्रार्थनेची शक्ती अधोरेखित झाली.

काकांच्या आरोग्यासाठी रिमांड होममधील या लहानग्यांनी केलेली प्रार्थना, ही खऱ्या अर्थाने त्यांच्यावरील विश्वास आणि प्रेमाची साक्ष असून ते लवकरच या संकटातून बरे होतील. अशी सदिच्छा भावना त्यानी व्यक्त केली.

## अरुण जगताप यांच्या आरोग्यासाठी पंजाबी राधा-कृष्ण मंदिरात प्रार्थना



नगर - सर्जेपूरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आली होती. या प्रार्थनेत हनुमान चालीसाचे पठण, मृत्यूंजय जाप तसेच हनुमान अष्टक व गायत्री मंत्राचे सामूहिक पठण करण्यात आले.

या प्रसंगी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, सर्व विश्वस्त मंडळी व भाविक उपस्थित होते. सर्वांनी मनोभावे अरुणकाकांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी देवाकडे साकडे घातले. पुणे येथील खाजगी रुग्णालयात अरुणकाका सध्या अतिदक्षता विभागात उपचार घेत असून, त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी शीख, पंजाबी व सिंधी समाजाने एकत्र येत प्रार्थना केली.

राकेश गुप्ता म्हणाले की, अरुणकाका हे सर्व नगरकरांचे भूषण आहेत. ते लवकरच बरे होवोत आणि पुन्हा एकदा सामाजिक कार्यात सक्रिय होतील, अशी सर्वांची आशा आहे. विविध धर्म, जातींच्या लोकांनी त्यांच्यासाठी केलेली प्रार्थना फळदायी ठरणार असल्याची आशा त्यांनी व्यक्त केली.

